# नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक
NAVAKAL

• पुणे, शनिवार ३० मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२५०, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 250 Marathi - Daily - Pune, 30 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
"तर मग, कागदी नोटा की प्लास्टिक नोटा?"
navakal.in
@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews


## रिझर्व्ह बँक देशात प्लास्टिक नोटा चलनात आणणार
## कागदी नोटा इतिहासजमा होणार ! बैठकीत चर्चा

भारतात वर्षानुवर्षे चलनात असलेल्या कागदी नोटा आता हद्दपार करून त्यांच्या जागी प्लास्टिक (पॉलिमर) नोटा आणण्याची तयारी रिझर्व्ह बँकेने सुरू केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या पाटणा आणि मुंबईत झालेल्या दोन बैठकांमध्ये प्लास्टिकच्या नोटा आणण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. कागदी नोटा वारंवार हाताळल्यामुळे मळतात, जीर्ण होतात. यावरून ग्राहक आणि दुकानदार यांच्यात खटके उडतात. या समस्येवर उपाय म्हणून प्लास्टिकच्या नोटा चलनात आणल्या जाणार आहेत. याशिवाय नोटा छपाईचा कोट्यवधींचा खर्चही यामुळे वाचणार आहे, असे सांगण्यात येत आहे.




■ मुंबई

डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना २०१२ मध्ये काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात १० रुपये मुल्याच्या प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याचा विचार झाला होता. मात्र तांत्रिक अडचणींमुळे तो प्रत्यक्षात येऊ शकला नव्हता. एटीएम मशीन जुन्या तंत्रज्ञानावर आधारित होत्या ही मुख्य अडचण होती. मात्र गेल्या दहा-पंधरा वर्षांत तंत्रज्ञानामध्ये मोठी सुधारणा झाली आहे. त्यामुळे २०१२ मध्ये आलेल्या तांत्रिक अडचणी आता उद्भवणार नाहीत, असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे आहे. सुरुवातीला १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिकच्या नोटा छापल्या जाण्याची शक्यता आहे. या नोटांमध्ये पारदर्शक भाग, मायक्रो-ऑप्टिक होलोग्राम आणि विशेष शाई यांसारखी प्रगत सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट केली जातील. यामुळे बनावट प्लास्टिक नोटा बनवणे कठीण होईल. सुरुवातीला पॉलिमरच्या नोटा छापण्याचा खर्च जरी कागदी नोटांच्या तुलनेत जास्त असला तरी त्या दीर्घकाळ टिकणार असल्याने वारंवार नोटा छापण्याच्या खर्चाची बचत होणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालानुसार कागदी नोटांच्या छपाईवर ६,३७२.०८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्याआधीच्या वर्षी ही रक्कम ५,१०१.०४ कोटी रुपये होती. म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत नोटा छापण्याचा खर्च सुमारे १ हजार कोटी रुपयांनी वाढला आहे. चलनी नोटांसाठी लागणारा खास कागद आणि शाईही भारताला विदेशातून आयात करावी लागते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, खराब झालेल्या किंवा फाटलेल्या कागदी नोटा गोळा करून नष्ट करणे ही रिझर्व्ह बँकेसाठी मोठी खर्चिक बाब ठरते. मागील आर्थिक वर्षात २३.८ अब्ज खराब नोटांची विल्हेवाट लावण्यात आली. हा आकडा त्याआधीच्या वर्षाच्या तुलनेत १२.३ टक्क्यांनी जास्त आहे. खराब झालेल्या नोटांमध्ये सर्वाधिक प्रमाण ५०० रुपयांच्या नोटांचे होते. त्याखालोखाल १०० रुपयांच्या नोटा खराब » पान ७ वर

### साठ देशांमध्ये प्लास्टिक चलन



सध्या जगातील ६० देशांमध्ये प्लास्टिक नोटांचा वापर केला जातो. सर्वप्रथम ऑस्ट्रेलियाने १९८८ मध्ये १० डॉलरची पॉलिमरची नोट चलनात आणली होती. त्यानंतर ब्रिटन, सिंगापूर, इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया आणि कॅनडा या देशांनीही प्लास्टिक नोटांचा पर्याय स्वीकारला आहे. काही देशांनी पूर्णपणे पॉलिमर चलनाचा स्वीकार केला आहे. तर काही देश मूल्यानुसार कागदी आणि पॉलिमर नोटांचे मिश्रण वापरतात. मात्र अमेरिकेत प्लास्टिकच्या नोटा वापरल्या जात नाहीत. अमेरिकन डॉलरच्या नोटा एका विशेष कॉटन-लिनन मिश्रणापासून तयार केल्या जातात.

## नीट प्रकरणी पंतप्रधान लक्ष ठेवतील कोर्टात सरकारचे आश्वासन

नीट पेपर लीक प्रकरणाशी संबंधित याचिकांवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, कोणतीही चूक होऊ नये म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, जोपर्यंत जबाबदारी निश्चित केली जात नाही, तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत. युपीएससी परीक्षांमध्ये अशी समस्या आलेली नाही. त्यामुळे एनटीएने त्यांच्याकडून शिकण्याची गरज आहे.



■ नवी दिल्ली

देशभरात नीट-युजी परीक्षा ३ मे रोजी घेण्यात आली होती. ७ मे रोजी पेपर फुटीची बातमी समोर आली. त्यानंतर १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्यात आली. आता २१ जून रोजी पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. एनटीएने कोर्टाला सांगितले की, संस्थेच्या पुनर्रचनेअंतर्गत १६ नवीन वरिष्ठ पदे निर्माण करण्यात आली आहेत, ज्यामध्ये डायरेक्टर आणि जॉईंट डायरेक्टर स्तरावरील पदांचा समावेश आहे. तसेच दोन जॉईंट सेक्रेटरी दर्जाच्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त महासंचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी तांत्रिक संचालन पाहतील तर दुसरे परीक्षा सुरक्षेची जबाबदारी सांभाळतील. मार्च २०२६ मध्ये एका सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची एनटीएच्या महानिदेशकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षा » पान ७ वर

## पुणे-पिंपरीत हातभट्टीच्या दारूने ४८ तासांत १३ जणांचा मृत्यू

■ पुणे

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात हातभट्टीच्या दारूमुळे गेल्या ४८ तासांत १३ जणांचा मृत्यू झाला. पिंपरी-चिंचवडच्या दापोडी, फुगेवाडी, हडपसर आणि काळेपडळ परिसरातील आनंदवन, काटेवस्ती, संजयनगर, आझाद चौक आणि जय महाराष्ट्र चौक भागातील कुटुंबांवर यामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी ८ आरोपींना अटक केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या घटनेत राहुल क्षीरसागर (४५), विजय शर्मा (४५), यशवंत पवार (६०) अरुण डाडर, अशोक चव्हाण, राजू राजपूत (५१), पांडुरंग फुगे, विजय राठोड (३१), राजेंद्र राठोड (३४), अकबर पठाण (५२), बाबा शेख, आनंद देसाई, आनंद निकाळजे यांचा मृत्यू झाला आहे. दारू विक्रेता योगेश वानखेडे, कर्नलसिंह विरखासह ८ जणांना अटक केली आहे. वानखेडेवर विविध पोलीस ठाण्यांत अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. त्याने पुरवठा केलेली दारू पिंपरी-चिंचवडच्या फुगेवाडीत कर्नलसिंह विरखा विकत होता. आरोपी वानखेडेला न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला ८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. मात्र पोलिसांच्या माहितीनुसार पिंपरी-चिंचवडमधील मृत्यू हे हातभट्टीच्या दारूमुळे नाही झाले. » पान ७ वर


सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा


## महाराष्ट्रासह चार राज्यांमध्ये एनआयएचे १२ ठिकाणी छापे

■ मुंबई

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) देशातील दहशतवादी नेटवर्कविरोधात कारवाई करत महाराष्ट्रासह चार राज्यांतील १२ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. यामध्ये उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार आणि महाराष्ट्र या राज्यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा संबंध पाकिस्तानशी जोडलेल्या एका मोठ्या शस्त्रतस्करी नेटवर्कशी असल्याची माहिती आहे.

एनआयएच्या पथकांनी उत्तर प्रदेशात ५, राजस्थानात २, बिहारमध्ये २ आणि महाराष्ट्रात ३ ठिकाणी शोधमोहीम राबवली. या कारवाईदरम्यान डिजिटल उपकरणे, कागदपत्रे आणि इतर संशयास्पद साहित्य जप्त करून त्यांची तपासणी सुरू करण्यात आली. ड्रोनच्या माध्यमातून भारतात शस्त्रे, दारुगोळा




आणि स्फोटके पाठवण्याचा कट रचला जात होता. या नेटवर्कचा मुख्य सूत्रधार पाकिस्तानशी संबंधित जसवीर चौधरी असल्याचा संशय आहे.

## नोंदीनुसार ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे द्या जरांगे-पाटलांची विखे यांच्याकडे मागणी

■ जालना

उद्यापासून रखरखत्या उन्हात अन्नपाण्याविना उपोषण करण्याचा इशारा देणाऱ्या मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांना भेटायला सरकारच्या वतीने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि भाजपा आमदार प्रसाद लाड यांचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटीत आले. त्यांनी सरकारने केलेल्या कामाची माहिती देऊन जरांगेंना उपोषण मागे घ्यायची विनंती केली. परंतु जरांगेंनी ५८ लाख नोंदी सापडलेल्यांची नावे आम्हाला द्या. त्यांना



प्रमाणपत्रे देऊन ती वैध घोषित करा आणि सातारा गॅझेट लागू करा, मराठा मंत्रालय वेगळे करा, अशा काही मागण्या केल्या. यावेळी विखे आणि जरांगे यांच्यात आकडेवारी आणि इतर मुद्यांवरून वाद झाला.

आज मराठा समन्वय समितीची छत्रपती संभाजीनगर येथे बैठक झाली. या बैठकीनंतर विखे आणि प्रसाद लाड यांनी अंतरवाली सराटे येथे जाऊन जरांगे यांची भेट घेतली. यावेळी विखे यांनी मराठा आरक्षणासाठी सरकार काय करत आहे, याची माहिती दिली. विखे म्हणाले की, प्रमाणपत्र देण्याबाबतचे काम आवेगाने केले पाहिजे » पान ७ वर

## ट्विशाची सासू गिरीबाला सिंहला ५ दिवसांची सीबीआय कोठडी



■ भोपाळ -

ट्विशा शर्मा कथित हुंडाबळी प्रकरणी आज ट्विशाची सासू निवृत्त न्यायाधीश गिरीबाला सिंह हिला भोपाळ जिल्हा न्यायालयाने ५ दिवसांची सीबीआय कोठडी दिली. या प्रकरणातील मुख्य आरोपी ट्विशाचा पती समर्थ सिंह याच्या कोठडीतही न्यायालयाने आज पाच दिवसांची वाढ केली.

गिरीबाला हिच्या कोठडीची मागणी सीबीआयने न्यायालयात केल्यानंतर गिरीबालाच्या वकिलांनी त्याला विरोध केला नाही. काल मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने गिरीबाललाचा अटकपूर्व जामीन अर्ज रद्द केला होता. त्यानंतर सीबीआयने तिच्या घराची ४ तास झडती घेऊन सायंकाळी तिला अटक केली होती. गिरीबालाचा मुलगा आणि ट्विशाचा पती समर्थला आधीच अटक केली होती. त्यानंतर गिरीबालाला अटक झाल्यामुळे या प्रकरणी तपासाला वेग आला.

नॉएडाची रहिवासी असलेल्या ट्विशा शर्माची एका डेटिंग ॲपवरून समर्थ याच्याशी ओळख झाली. डिसेंबर २०२५ मध्ये ट्विशा व समर्थ यांचा विवाह संपन्न झाला. त्यानंतर अवघ्या ५ महिन्यांत १२ मे २०२६ रोजी ट्विशाने गळफास घेऊन आत्महत्या केली. समर्थ आणि सासू गिरीबाला ट्विशाचा हुंड्यासाठी छळ करत होत्या. त्यांनीच तिला आत्महत्या करण्यास भाग पाडले असा आरोप ट्विशाच्या कुटुंबियांनी केला.

## पार्थ पवार-छगन भुजबळ यांच्यात अन्नधान्य टेंडरवरून जोरदार खडाजंगी?

■ मुंबई

अन्न व नागरी पुरवठा विभागातील अन्नधान्य पुरवठ्याच्या टेंडरवरून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राष्ट्रीय सरचिटणीस पार्थ पवार आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यात मंत्रालयात जोरदार खडाजंगी झाल्याची चर्चा आहे. एकाच ठेकेदाराच्या निवडीवरून दोन्ही नेत्यांमध्ये शाब्दिक वाद झाला. दरम्यान कालच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भुजबळ यांच्यावर आरोप करत हाच अन्नधान्य टेंडरचा मुद्दा छेडला होता.



या योगायोगाबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. एका विशिष्ट ठेकेदाराच्या नावावरून वाद निर्माण झाला. संबंधित ठेकेदाराला कंत्राट मिळावे यासाठी पार्थ यांचा आग्रह आहे. त्यासाठी त्या ठेकेदाराला थेट भुजबळ यांच्याकडे पाठवण्यात आले. याच मुद्यावरून दोन्ही नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याची माहिती आहे. बैठकीत भुजबळ यांनी शासकीय नियम आणि टेंडर प्रक्रिया कशी चालते, याचा मला प्रदीर्घ अनुभव आहे. त्यात असा थेट हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट सांगितले. तुमच्या वडिलांनी किंवा आजोबांनीही कधी अशा पद्धतीने मला सांगितले नव्हते. अशा शब्दांत भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली. त्यावर पार्थ पवार यांनी असे असेल तर मला तुमच्याकडचा विभाग काढून टाकावा लागेल, अशा शब्दांत भुजबळ यांना समज दिल्याचे समजते.

## मविआचे १५ जागांवर एकमत नाशिक-नांदेडचा तिढा कायम

■ मुंबई

महाविकास आघाडीत विधान परिषद निवडणुकीसाठी १७ पैकी १५ जागांवर उमेदवारांबाबत एकमत झाले.नाशिक आणि नांदेड या दोन जागांवर अद्याप तिढा कायम असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. यशवंतराव चव्हाण सभागृहात मविआ नेत्यांची बैठक पार पडल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली.

या बैठकीनंतर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, निवडणुकीबाबत दोन दिवसांपूर्वी प्राथमिक चर्चा झाली होती. आज जागावाटपाबाबत अंतिम बैठक झाली. १७ पैकी १५ जागांवर आमचे एकमत झाले. उर्वरित दोन जागांबाबत चर्चा सुरू असून, पुढील दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल. नाशिक आणि नांदेड या दोन जागांवर तिन्ही पक्षांनी दावा केला आहे. जागावाटपानुसार काँग्रेस चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा-गोंदिया, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-बीड-लातूर आणि नागपूर या ८ जागांवर निवडणूक लढवणार आहे. उबाठा रत्नागिरी, जळगाव, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर या ४ जागांवर उमेदवार देणार आहे. तर शरद पवार गट पुणे, ठाणे आणि सातारा-सांगली या तीन जागांवर निवडणूक लढवणार आहे.

## भारतीय हवामान खात्याचा पावसाचा अंदाज ! जूनमध्ये कमी

■ मुंबई

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन आठवड्यांचा हवामान अंदाज जाहीर केला. जूनमध्ये महाराष्ट्रातील किनारपट्टी, राज्याच्या अंतर्भागात कमी पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील किनारपट्टी भाग आणि उत्तर मध्य महाराष्ट्रात ४ जूनपर्यंत काही ठिकाणी दररोज १० मिलीमीटर इतका तुरळक पाऊस पडू शकतो. त्यानंतर ४ ते ११ जून दरम्यान किनारपट्टी भागात पावसाचा जोर काही प्रमाणातच वाढण्याची शक्यता आहे. याच कालावधीत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पावसाची व्याप्ती वाढू शकते. ३१ मे ते ३ जून या कालावधीत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील आठवड्यात मान्सूनचे वारे दक्षिण भारतातील काही भागांमध्ये पुढे सरकण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## फ्लोरिडात न्यू ग्लेन रॉकेटचा स्फोट ब्लू ओरिजिनच्या चाचणीवेळी दुर्घटना

अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यातील केप कॅनवेरल स्पेस फोर्स स्टेशनवर ब्लू ओरिजिन कंपनीच्या न्यू ग्लेन या रॉकेटची इंजिन हॉटफायर चाचणी सुरू असताना स्फोट झाला. ही घटना स्पेस लाँच कॉम्प्लेक्स-३६ येथे स्थानिक वेळेनुसार काल रात्री सुमारे ९ वाजता घडली. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्व कर्मचारी सुरक्षित असल्याची माहिती ब्लू ओरिजिन कंपनीने दिली आहे.



■ फ्लोरिडा

या रॉकेटमधून ॲमेझॉनच्या प्रोजेक्ट कुइपरसाठी ४८ उपग्रह प्रक्षेपित करण्यात येणार होते. स्फोटाच्या वेळी हे उपग्रह रॉकेटमध्ये बसवण्यात आलेले नव्हते. न्यू ग्लेन रॉकेटची चौथी मोहीम ४ जूनपासून सुरू होणार होती. न्यू ग्लेन हे ब्लू ओरिजिनचे महत्त्वाकांक्षी आणि अवजड मालवाहू रॉकेट मानले जाते. कंपनीच्या ब्लू मूनल्युनर लँडर कार्यक्रमासह नासाच्या आर्टेमिस चंद्र मोहिमेसाठी हे रॉकेट अत्यंत महत्त्वाचे आहे. पुढील वर्षीच्या आर्टेमिस-३ मोहिमेसाठी आणखी एक ब्लू मून लँडर याच रॉकेटद्वारे प्रक्षेपित करण्यात येणार होते.

## येत्या पाच वर्षांत उष्णतेचा कहर संयुक्त राष्ट्र संघाचा गंभीर इशारा

■ वॉशिंग्टन

ग्लोबल वॉर्मिंग अर्थात जागतिक तापमान वाढीची समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक उग्र होत चालली आहे. तापमान वाढीमुळे उन्हाळ्याची तीव्रता वर्षागणिक वाढत चालली आहे.आगामी पाच वर्षांत तर उष्णतेचा कहर होणार आहे. उष्णतेचे याआधीचे सर्व विक्रम पुढील पाच वर्षांत मोडित निघणार आहेत, असा गंभीर इशारा संयुक्त राष्ट्र संघाच्या ताज्या अहवालात देण्यात आला.




अहवालात असा अंदाज वर्तवण्यात आला आहे की, पुढील पाच वर्षांत जागतिक तापमानाची पातळी सुरक्षित मर्यादा ओलांडून पुढे जाणार आहे. या काळात उष्णतेचे आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडित निघतील.

जागतिक हवामानशास्त्र संघटना आणि ब्रिटनच्या हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार २०२६ ते २०३० या कालावधीत जागतिक सरासरी तापमान औद्योगिकीकरणपूर्व काळाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसने वाढण्याची ७५ टक्के शक्यता आहे.

# प्रसिद्ध उर्दू कवी, गझलकार आणि पद्मश्री पुरस्कार विजेते
# डॉ. बशीर बद्र

**डॉ. बशीर बद्र यांचे (२८ मे २०२६ रोजी) निधन झाले. बशीर बद्र यांचा अल्पपरिचय. जन्म १५ फेब्रुवारी १९३६ फैजाबाद येथे येथे झाला. डॉ. बशीर बद्र यांची देशातील आघाडीच्या उर्दू शायरांमध्ये गणना होत असे. डॉ.बशीर बद्र यांचे पूर्ण नाव सय्यद मोहम्मद बशीर. त्यांनी आपल्या कविता आणि गझलांमधून आपल्या वेदना आणि भावना अतिशय सुंदर आणि लयबद्धपणे व्यक्त केल्या. उर्दू साहित्यातील कविता आणि गझल यांना डॉ. बशीर बद्र यांनी एक नवीन शैली आणि स्वर दिला. म्हणूनच त्यांना मेहबूब शायर म्हणत असत.**



डॉ.बशीर बद्र यांनी वयाच्या सातव्या वर्षापासून गझल लिहिण्यास सुरुवात केली. बशीर बद्र सातव्या वर्गात असताना त्यांची एक गझल 'निगार' नावाच्या मासिकात प्रकाशित झाली होती. वयाच्या २० व्या वर्षी त्यांच्या गझल्स सीमा ओलांडून पाकिस्तानातही प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यानंतर बशीर बद्र यांची अनोखी गझल्स ऐकण्यासाठी लोक मुशायऱ्यांना गर्दी करू लागले. परंतु १९८० सालानंतर त्यांच्या रचना खूप लोकप्रिय झाल्या.

बशीर बद्र हे अनेक वर्षांपासून पोलीस खात्यात काम करत होते. त्यांचे पोलीस खात्यात येणे हा योगायोगच होता. बशीर बद्र यांचे वडील पोलिसात होते. वडिलांचे निधन झाले तेव्हा बशीर बद्र नुकतेच हायस्कूल पास झाले होते. कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर पडली, त्यानंतर त्यांनी शिक्षण सोडून पोलीस खात्यात ८५ रुपये प्रति महिना पगारावर काम करण्यास सुरुवात केली.

१९६९ मध्ये, बशीर बद्र अलिगढ विद्यापीठात उर्दू मध्ये एमए करण्यासाठी दाखल झाले, तेव्हा त्यांच्या गझल आधीच तिथल्या अभ्यासक्रमात शिकवल्या जात होत्या. ते एमए करायला गेले तेव्हा लोकांना कळलं की, प्रसिद्ध कवी अजून एमए पास झालेला नाही आणि ते त्यांच्या गझल वाचणार का आणि तीच परीक्षा देणार की काय अशी चर्चा विद्यापीठात होती. तेव्हा त्यांच्या प्राध्यापकाने असे काही होणार नाही असे सांगितले. आम्ही त्यांच्यासाठी स्वतंत्र पेपर तयार करू. त्यांच्या गझल शिकवल्या जात राहतील, पण ते त्यांच्या गझलांची परीक्षा घेणार नाहीत. मग त्यांच्यासाठी वेगळा पेपर बनवला. बशीर बद्र यांनी पेपर दिला आणि टॉपही केले. नंतर त्यांनी अलीगढ विद्यापीठातूनच पीएचडी केली. त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल डॉ.बशीर बद्र यांना १९९९ मध्ये भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते.



फैजाबादहून मेरठला गेल्यानंतर, ते भोपाळचे रहिवासी झाले जिथे ते आपली पत्नी डॉ. राहत बद्र आणि मुलगा तैयब बद्रसह राहत. गेल्या अनेक वर्षांपासून ते डिमेंशिया नावाच्या आजाराने त्रस्त होते. पण यांची कला आजही लोकांच्या हृदयात कोरलेली आहे.

**बशीर बद्र यांची शायरी व ओळी.**

आंखों में रहा दिल में उतर कर नहीं देखा
कश्ती के मुसाफिर ने समंदर नहीं देखा।
महबूब का घर हो कि बुजुर्गों की जमीनें
जो छोड़ दिया फिर उसे मुड़कर नहीं देखा।
खत ऐसा लिखा है कि नगीने से जड़े हैं
वो हाथ कि जिसने कोई जेवर नहीं देखा।
पत्थर मुझे कहता है मेरा चाहने वाला
मैं मोम हूं उसने मुझे छू कर नहीं देखा।
लोग टूट जाते हैं एक घर बनाने में
तुम तरस नहीं खाते बस्तियाँ जलाने में।

बशीर बद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# सोपारा बौद्ध स्तूपात 'ऑडिओ गाईड' क्यूआर कोड स्कॅन करताच माहिती



■ नालासोपारा

**सोपारा** येथील अडीच हजार वर्षे जुन्या बौद्ध स्तूपाच्या संवर्धनाचे काम पुरातत्व विभागाने हाती घेतले आहे. या स्तूपात ऑडिओ गाईड सेवा सुरू करण्यात आली आहे. यासाठी स्तूप परिसरात क्यूआर कोड उभारण्यात आला असून, तो स्कॅन करताच मोबाईलवर स्तूपाची ध्वनिमुद्रीत माहिती मिळणार आहे.

नालोसापारा पश्चिमेच्या सोपारा येथे अडीच हजार वर्षे जुना बौद्ध स्तूप आहे. या स्तूपाची दुरवस्था झाली होती. वसईतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी समितीने तसेच बहुजन विकास आघाडीच्या शिष्टमंडळाने दिल्लीत जाऊन पाठपुरावा केला होता. त्यानुसार स्तूपाच्या संवर्धनाचे काम सुरू करण्यात आले आहे. काल पुरातत्त्व खात्याने स्तूपाच्या परिसरात प्रकाशयोजना कार्यान्वित केली असून, ऑडिओ गाईडची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

स्तूपाच्या परिसरात क्यूआर कोड लावण्यात आला आहे. मोबाईलवर तो कोड स्कॅन करताच स्तूपाची संपूर्ण माहिती ध्वनिमुद्रित स्वरूपात (ऑडिओ) मिळते. याशिवाय परिसरात लॉर्ड बुद्धा कल्चरल सेंटर तयार करण्यात येत असून, त्याचेही काम प्रगतिपथावर आहे.

पुरातत्त्व शास्त्रज्ञ अधीक्षक डॉ. अभिजित अंबेकर यांच्या संकल्पनेतून हे ऑडिओ गाईड तयार करण्यात आले आहे. यावेळी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे माजी अतिरिक्त टी. जे. अलोन, डॉ. रोहित पिसाळ बाबासाहेबांचे सहकारी सवादकर यांचे नातू विक्रांत व विजय सवादकर व शतकोत्तर रौप्यमहोत्सवी समितीचे सदस्य उपस्थित होते.

# त्र्यंबकेश्वरमध्ये २,५०० रुपयांचे व्हीआयपी दर्शन सुरू

**नाशिक** - बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरात आता व्हीआयपी दर्शन सुरू करण्यात आले आहे. भाविकांकडून २५०० रुपये घेऊन हे दर्शन दिले जाणार आहे. पहिल्याच दिवशी ३० हून अधिक भाविकांनी या सुविधेचा लाभ घेतला. गर्दीवरील नियंत्रण आणि दर्शनाच्या नावाखाली होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी देवस्थान ट्रस्टने तिरुपतीच्या धर्तीवर ही नवी व्यवस्था सुरू केली आहे. सकाळ आणि संध्याकाळच्या ठराविक सत्रांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्र्यंबकेश्वर येथे पूजा-विधी, कुशावर्त स्नान आणि भगवान त्र्यंबकराजांच्या दर्शनासाठी दररोज मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते.

# यंदा मिरगी पेरण्या होणार ७ जूनपासून मोसमी पाऊस

**पंजाबराव डख यांचा ताजा हवामान अंदाज**

■ मुंबई

**यंदा** जूनच्या दुसऱ्या आठवड्यात म्हणजेच ७ जून ते १२ जूनच्या दरम्यान राज्यात मान्सूनचे जोरदार आगमन होणार आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांची मिरगी पेरणी सुकर होणार असल्याचा अंदाज प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

पंजाबराव डख यांनी सोशल मीडियावर व्हिडिओच्या माध्यमातून व्यक्त केलेल्या ताज्या हवामान अंदाजात म्हटले आहे की, राज्यात ७ ते १२ जूनच्या दरम्यान मोसमी पाऊस येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी शेतीची कामे करण्यासाठी पुढील ९ दिवस शिल्लक राहिले आहेत. या काळात पेरणीपूर्व कामे करून घ्यावी. तसेच शेतकऱ्यांनी घाईगडबडीत पेरणी करू नये. केवळ थोडेफार वातावरण तयार झाले किंवा हलका पाऊस पडला म्हणून पेरणीची घाई करू नका. जमिनीच्या मगदूरानुसार आणि जमिनीमध्ये पुरेसा ओलावा म्हणजे ८० ते १०० मिमी पाऊस पडल्याची खात्री करूनच मिरगी पेरणी म्हणजेच मृग नक्षत्रातील पेरणी करावी. या काळात काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.





# वसई रोड रेल्वे टर्मिनसच्या कामाला सुरुवात पहिल्या टप्प्यात ८६ कोटींची निविदा

■ वसई

**गेल्या** अनेक वर्षांपासून रखडलेल्या वसई रोड रेल्वे टर्मिनस प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात विविध कामांच्या ८६ कोटींच्या निविदा काढण्यात आल्या आहेत.

वसईतून मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी प्रवास करत असतात. परंतु येथील प्रवाशांना वांद्रे, कुर्ला, दादर आणि सीएसटी रेल्वे स्थानकात जावे लागते. याशिवाय दररोज ६० लांब पल्ल्यांच्या गाड्यांचे वसई स्थानकात इंजिन बदलण्यात येते. ४० हून अधिक मालगाड्या वसई स्थानकात येत असतात. त्यामुळे वसई रोड रेल्वे स्थानकात टर्मिनस बनवावे अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती. रेल्वे टर्मिनस बनविण्याचा पहिला प्रस्ताव २०१३ बनविण्यात आला होता. मात्र विविध कारणांमुळे हे काम रखडले होते. अखेर या कामाला सुरुवात झाली आहे.

वसई रेल्वे टर्मिनस प्रकल्पासाठी ८६ कोटींच्या मुख्य कामांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. त्यात अंतर्गत स्थानक इमारत, फलाट, रेल्वे ट्रॅकसंबंधित कामे, सर्क्युलेटिंग एरिया विकास तसेच इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. काम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सध्या प्रकल्पस्थळी ट्रॅक हटविण्याचे काम, भू-तांत्रिक तपासणी, सर्व्हे कार्य तसेच साईट मोबिलायझेशनची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. याशिवाय स्कायवॉक व पादचारी उड्डाणपुलासाठी ३४ कोटींची निविदा जून महिन्यात काढण्यात येणार आहे. वसई टर्मिनस तयार झाल्यास रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

# १० मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख मदतीचे धनादेश

■ पालघर

**जिल्ह्यातील** धानिवरी येथे १८ मे रोजी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या १३ नागरिकांपैकी १० जणांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत प्रत्यक्ष देण्यात आली. तहसीलदार सुनील कोळी यांच्या हस्ते मदतीच्या या धनादेशाचे नुकतेच वाटप करण्यात आले.

१८ मे रोजी दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात टेम्पो आणि कंटेनरची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला होता. या दुर्घटनेत १३ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले होते.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि आरोग्य विभागाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य केले होते. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येक मृताच्या कुटुंबियांना ५ लाखांची आर्थिक मदत जाहीर केली होती. त्यानंतर अवघ्या १० दिवसांतच ही आर्थिक मदत १० जणांच्या कुटुंबियांना वितरित केली असून, उर्वरित तिघांच्या वारसांची आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर त्यांनाही ही मदत वितरित केली जाईल, असे प्रभारी जिल्हाधिकारी मनोज रानडे यांनी सांगितले.

# सावत्र मुलाच्या पाठोपाठ आईनेही आत्महत्या केली

■ अंबाजोगाई

**२१ वर्षे** वयाच्या सावत्र मुलाने विष प्राशन करून आत्महत्या केल्यानंतर पाच दिवसांतच आईनेही गळफास घेऊन आपले जीवन संपवले. ही हृदयद्रावक घटना केज तालुक्यातील सोनीजवळा येथे घडली.

सोनीजवळा येथील अनिल साहेबराव पवार (२१) याने चार दिवसांपूर्वी विषप्राशन केल्याने त्याला तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र, बुधवारी रात्री त्याची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अपयशी ठरली आणि उपचार सुरू असतानाच अनिलचा मृत्यू झाला. नात्याने सावत्र मुलगा असलेल्या अनिलचा मृत्यू झाल्याचे समजताच त्याच्या सावत्र आईनेही विरह सहन न झाल्याने स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या व्यंकटराव डावळे सभागृहाच्या पाठीमागील एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

# इचलकरंजीत जलवाहिनी फुटली लाखो लीटर पाणी गेले वाया



■ इचलकरंजी

**शहरातील** डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सुरू असलेल्या नवीन रस्त्याच्या कामादरम्यान जलवाहिनीला काल सायंकाळी गळती लागली. जेसीबीच्या धडकेमुळे मुख्य जलवाहिनी फुटल्याने लाखो लीटर पाणी रस्त्यावर वाया गेले असून, या परिसरात तळ्याचे स्वरूप निर्माण झाले होते.

या मार्गावर पालिकेकडून नवीन रस्त्याचे काम सुरू असून, जेसीबीच्या सहाय्याने खोदाईचे काम करण्यात आले होते. यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे मुख्य जलवाहिनीला जेसीबीचा धक्का बसून गळती सुरू झाली. या घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे स्थायी समिती सभापती सतिश मुळीक तसेच जल अभियंता बाजीराव कांबळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. या प्रकारामुळे परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. अनेकांनी मोबाईलवर या घटनेचे चित्रीकरण केले. यावेळी काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला. दरम्यान, खुदाई करताना आवश्यक दक्षता न घेतल्याने हा प्रकार घडल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. संबंधित ठेकेदार व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणावरून उलट सुलट प्रतिक्रिया उमटत होत्या.



# नाल्यांवर उंच जाळ्या बसविणार पालिका १५ कोटी खर्च करणार

■ मुंबई

**काही** दिवसांपूर्वी चांदिवली परिसरातील एका नाल्यात चक्क रिक्षाचा सांगाडा सापडला होता. या पार्श्वभूमीवर आता कचरा, रिक्षाचा सांगाडा, गाद्या उशा, फर्निचर आदी साहित्य थेट नाल्यात फेकण्यास प्रतिबंध करण्यासाठी पालिका प्रशासन आता मुंबईतील काही नाल्यांजवळ उंच जाळ्या बसविणार आहे. त्यासाठी पालिका १५ कोटी रुपये खर्च करणार आहे. पालिका झोन पाचमधील तब्बल ५१,९३१ मीटर लांबीच्या नाल्याजवळ अशा जाळ्या बसविल्या जातील.

मुंबई महापालिकेच्या परिमंडळ पाचमधील एल विभाग (कुर्ला), एम-पूर्व विभाग (मानखुर्द) आणि एम-पश्चिम विभाग (चेंबूर) या भागांमध्ये असणाऱ्या नाल्याजवळ १० ते १२ फूट उंच जाळ्या बसविल्या जाणार आहेत. कारण या तीन परिसरात झोपडपट्ट्यांचे प्रमाण अधिक असल्याने नागरिकांकडून नाल्यांमध्ये कचरा टाकण्याचे प्रकार वारंवार घडत असतात.

परिमंडळ पाचमधील मोठ्या नाल्यांची एकूण लांबी ५१,९३१ मीटर असून, यंदा मान्सूनपूर्व स्वच्छता मोहिमेत येथून आतापर्यंत ६,४९१ मेट्रिक टन कचरा बाहेर काढला आहे. पूर्व उपनगरातील मोठ्या नाल्यांच्या सफाईसाठी २१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# वारणा नदी पात्रात ४ पिल्लांसह महाकाय मगरीचा वावर वाढला

■ हातकणंगले

**सांगली** आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांच्या सीमेवरील निलेवाडी-ऐतवडे खुर्द पुलाजवळ वारणा नदीत महाकाय मगरीसह चार लहान



पिल्ले आढळली आहेत. यामुळे नदीकाठच्या नागरिकांमध्ये आणि जनावरे पाणी पिण्यासाठी घेऊन जाणाऱ्या गुराख्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

वारणा नदीत वाढलेला मगरींचा वाढता संचार लक्षात घेत वनविभागाने परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. लोकांनी नदीत उतरणे टाळावे, कपडे धुणे, जनावरे धुणे किंवा पोहण्यासाठी नदीपात्रात जाऊ नये, रात्रीच्या वेळी सावध राहावे, अंधारात नदीकाठच्या परिसरात फिरणे पूर्णपणे टाळावे, लहान मुलांवर लक्ष ठेवावे, मुलांना नदीपासून दूर ठेवावे, अशा सूचना वनविभागाने केल्या आहेत. या वनविभागाने या मगरींना सुरक्षित अधिवासात सोडावे किंवा नागरिकांच्या सुरक्षेसाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# अविमुक्तेश्वरानंद यांचा अटकपूर्व जामीन सुप्रीम कोर्टात कायम

■ नवी दिल्ली

**पोक्सो** प्रकरणात ज्योतिर्मठचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. प्रयागराजमधील झूंसी परिसरातील शिबिरात दोन अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात त्यांच्या अटकपूर्व जामिनाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळत अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला जामीन कायम ठेवला.

अविमुक्तेश्वरानंद यांच्यावर प्रयागराज येथील झूंसी परिसरातील एका शिबिरात दोन अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप झाला होता. या प्रकरणात पोक्सो न्यायालयाच्या आदेशानंतर स्वामी अविमुक्तेश्वरानंद आणि त्यांचे शिष्य मुकुंदानंद ब्रह्मचारी यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला होता. यानंतर स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी अटक टाळण्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# पुण्यात जनगणना करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला मारहाण

**आरोपींवर गुन्हा दाखल**

■ पुणे

**पुण्यात** जनगणना कामासाठी गेलेल्या एका महिला कर्मचाऱ्याला काही जणांकडून आधी शिवीगाळ आणि त्यानंतर मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार विकास मोरे, क्रांती मोरे, मुक्ता कसबे, लीलावती मोरे, अभिजित मोरे आणि इतर काही महिला व पुरुष अशा एकूण पाच ते दहा जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

महर्षीनगर परिसरातील मीनाताई ठाकरे वसाहतीत पुणे महानगरपालिकेत कार्यरत असलेली महिला कर्मचारी सध्या सुरू असलेल्या जनगणना कामासाठी या भागात गेली होती. काम सुरू असताना आरोपी आणि फिर्यादी यांच्यात वाद झाला आणि त्यानंतर परिस्थिती बिघडली. तक्रारीनुसार, विकास मोरे यांच्या पत्नी क्रांती मोरे, बहीण मुक्ता कसबे, पुतण्या अभिजित मोरे तसेच कुटुंबातील इतर सदस्यांनी महिला कर्मचाऱ्याला अडवून शिवीगाळ केली.

# प्रादेशिक पक्षांच्या उत्पन्नात घट! अनेक पक्षांचा खर्च उत्पन्नापेक्षा अधिक

■ नवी दिल्ली

**देशातील** ३६ प्रादेशिक राजकीय पक्षांच्या उत्पन्नात २०२४-२५ या आर्थिक वर्षात मोठी घट झाली आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) यांच्या अहवालानुसार, या पक्षांचे २४-२५ मध्ये एकूण उत्पन्न १,१९२.९४ कोटी रुपये होते. त्या मागील २०२३-२४ वर्षात हे उत्पन्न २,४६३.१७ कोटी रुपये होते. त्यामुळे एका वर्षात तब्बल १,२७०.२३ कोटी रुपयांची म्हणजेच ५१.५७ टक्क्यांची घट झाली आहे.

३६ पैकी २१ प्रादेशिक पक्षांनी त्यांच्या घोषित उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला आहे. या पक्षांचा एकूण खर्च १,४३३.०७ कोटी रुपये असून, तो उत्पन्नापेक्षा सुमारे २४०.१२ कोटी रुपये जास्त आहे. हा खर्च उत्पन्नाच्या जवळपास २० टक्के अधिक असल्याचे एडीआरने म्हटले आहे. आयएसआर काँग्रेसने आपल्या उत्पन्नापेक्षा १९९.८२ कोटी रुपये अधिक खर्च केला असून, हा खर्च उत्पन्नाच्या १४२.३३ टक्के जास्त आहे. याशिवाय एआयटीसी, बीआरएस, बीजू जनता दल, जदयू आणि समाजवादी पक्षानेही उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला आहे. एडीआरने पक्षांच्या लेखापरीक्षण अहवाल सादरीकरणातील विलंबावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. १५ पक्षांनी वेळेत अहवाल सादर केले, तर २१ पक्षांनी दोन ते ९६ दिवस उशिराने अहवाल दिले. द्रमुक, शिंदे सेना, उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि जम्मू-काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स यांसारख्या मोठ्या पक्षांचे २०२४-२५ चे ऑडिट अहवाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ६७ प्रादेशिक पक्षांपैकी ३१ पक्षांनी निश्चित मुदत संपल्यानंतरही २०७ दिवसांपर्यंत त्यांचे ऑडिट अहवाल संकेतस्थळावर अपलोड केले नव्हते. उत्पन्नाच्या बाबतीत तेलुगू देशम पार्टी अव्वल ठरली. पक्षाने २२८.३१ कोटी रुपयांचे उत्पन्न जाहीर केले. त्यानंतर एआयटीसीचे २१९.३५ कोटी रुपये आणि आयएसआर काँग्रेसचे १४०.३९ कोटी रुपये उत्पन्न होते.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# हे विषारी यंत्रणेचे बळी

पुण्याच्या फुगेवाडी आणि परिसरामध्ये झालेले विषारी दारूकांड म्हणजे राज्यात सर्रासपणे ही अवैध दारूविक्री सुरू असल्याचे सिद्ध करणारा प्रकार ठरतो. या दुर्घटनेत हा मजकूर लिहीपर्यंत चौदा जणांचे बळी गेल्याचे समोर आले होते. हा आकडा वाढण्याचीही शक्यता व्यक्त केली गेली होती. दारूबंदी हा प्रकार तर दूरच राहिला. परंतु अवैधपणे तयार केलेली दारू इतक्या उघडपणे विकली जात असताना पोलीस यंत्रणा त्याकडे किती सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात हेही त्यातून सिद्ध होते. या दुर्घटनेत बळी गेलेल्यांच्या नातेवाईकांचा आक्रोश हा आपल्या घरातील कर्ता माणूस गेल्याबद्दल होणे स्वाभाविक आहे. त्याबरोबरच पोलिसांकडून झालेल्या हप्तेबाजीचा या महिलांनी केलेला जाहीर उल्लेख पोलीस खात्यातील निर्ढावलेपणाचा कृतघ्न प्रकारच म्हणावा लागतो. तिथे अशा प्रकारची दारू विकली जाते याची कल्पना असूनही पोलीस हप्ते घेऊन निघून जातात अशा शब्दांमध्ये या परिसरातल्या महिलांनी आपला संताप व्यक्त केला आहे. सर्रासपणे विकल्या जाणाऱ्या या अवैध दारूची निर्मिती अतिशय विचित्र परिस्थितीत केली जात असते. हा प्रकार घडल्यानंतर नेहमीप्रमाणे पोलिसांनी कारवाईचे नाटक केले. त्यात जवळपास पंचवीस-तीस दारूचे कॅन जप्त केले गेले. टेम्पोमधून ही दारू त्या परिसरात पोहोचवली जात होती आणि तिची सर्रास विक्रीही होत होती. दारू भरण्यासाठी वापरले गेलेले कॅन आणि ती तयार करताना वापरले गेलेले पदार्थ या सगळ्यांमधून केवळ रग्गड पैसा कमावण्याचाच उद्देश दिसून येतो. केवळ पोलिसांना मॅनेज केले की, हे धंदे मोकाटपणे सुरू राहतात. म्हणूनच हे केवळ विषारी दारूचे बळी नाहीत तर विषारी यंत्रणेचेही बळी आहेत हे नाकारता येणार नाही. या यंत्रणा जर शुद्धीवर असत्या तर त्यांनी हा प्रकार होऊ दिला नसता. दुर्घटना घडल्यानंतर चौकशा आणि कडक शिक्षा करण्याचे आदेश हे सगळे सरकारी चौकटीतले सोपस्कार ठरतात.

### हातभट्ट्यांचा सुळसुळाट

एकाचवेळी तब्बल चौदा जणांचा विषारी दारूमुळे बळी जाण्याचा हा प्रकार पुन्हा एकदा महाराष्ट्राची मान खाली घालायला लावणारा आहे. इतक्याच मोठ्या संख्येने अशा प्रकारची अवैध पद्धतीने बनवलेली दारू पिणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याचे स्पष्ट होते. ठिकठिकाणी अशी दारू बनवण्याचे गुत्ते किंवा अड्डे तितक्याच मोकाटपणे सुरू आहेत. महानगरांमधल्या झोपडपट्ट्यांमध्ये किंवा चाळींमध्ये या स्वस्तातल्या दारूची सर्वाधिक विक्री करता येते. तर ग्रामीण भागामध्ये गावाच्याबाहेर थोड्या आडवळणाला अशा दारूच्या भट्ट्या सुरू असतात. अगदी मोठ्या ट्रॅव्हल टेम्पोमधून कॅन भरून त्याची छुपी वाहतूक सुरू राहते. पोलिसांना संशय येऊ नये म्हणून वाहतूक करताना वेगवेगळ्या युक्त्या-प्रयुक्त्या केल्या जात असल्या तरी अशा प्रकारचे गुत्ते किंवा हातभट्ट्या कुठे कुठे सुरू आहेत याची बऱ्यापैकी माहिती पोलिसांकडे असते. किंबहुना पोलीस या सगळ्या हातबट्ट्यांचा ठावठिकाणा शोधून काढतात. कारण त्याच्यावर त्यांची हप्ताभट्टी सुरू राहते. फुगेवाडीतली हप्तेबाजी ही तर आता अगदी उघडपणे समोर आली आहे. अशा अवैध धंद्यांकडे पोलीस इतक्या सोयीस्करपणे कानाडोळा किंवा दुर्लक्ष करू शकतात हा धक्कादायक प्रकार ठरतो. कायदा सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी ज्या पोलिसांवर असते त्याच पोलीस यंत्रणा या तथाकथित कायदा सुव्यवस्थेचे अशा पद्धतीने धिंडवडे काढतात. फुगेवाडीतले हे प्रकरण समोर आल्यानंतर आता गावोगावी पुढच्या महिना पंधरा दिवसांत हातभट्टीवाल्यांचे धंदे बंद केले जातील. आणि मग कुठे-कुठे, कशी-कशी कडक कारवाई झाली याचीही वर्णने प्रसिद्ध होतील. मात्र जसजसा हा प्रकार विस्मरणात जाईल तसतसा पुन्हा या अवैध दारूचे गुत्ते सुरू व्हायला लागतात. किंबहुना आता तुम्ही ते सुरू करायला हरकत नाही याची सूचनाही पोलिसांकडूनच त्यांना मिळते. यापूर्वी २०१५ साली विषारी दारूची महाराष्ट्रातली सर्वात भीषण घटना मुंबईच्या मालवणी परिसरात घडली. त्यात तब्बल १०६ जणांचा मृत्यू झाला होता. २०१३ ला विरार भागातल्या दुर्घटनेत १२ जणांचा तर भंडाऱ्यातल्या घटनेत ९ लोकांचा मृत्यू झाला होता.

### अवैध धंद्यांनाच संरक्षण

राज्य सरकारच्या उत्पादन शुल्क विभागाच्या मार्फत या अवैध हातबट्ट्यांवर कारवाया केल्या जात असल्या तरी स्थानिक पोलिसांचे आणि हातभट्टीवाल्यांचे एकमेकांमधले हितसंबंध हे प्रकार चालू राहतात. कारण आतासुद्धा दापोडी, हडपसर, फुगेवाडी या भागातील लोकांचे बळी गेलेले आहेत. या अवैध दारूच्या विक्रीचे नेटवर्क किती व्यवस्थितपणे पसरलेले होते हे स्पष्ट होते. कायदा सुव्यवस्थेचे मुख्य काम हे सर्वसामान्य माणसाच्या जीविताचे संरक्षण करणे हे आहे. याशिवाय त्याच्या मालमत्तांचेही संरक्षण अभिप्रेत आहे. सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक मालमत्तेचेही नुकसान टाळण्याची जबाबदारी कायदा सुव्यवस्थेवर येऊन पडते. परंतु यातली शोकांतिका अशी आहे की, आज पोलीस यंत्रणा अवैध धंदे करणाऱ्यांनाच छुपे संरक्षण देत राहते. मग अगदी मादक पदार्थांच्या तस्करीपासून ते जुगार मटकासारख्या अवैध धंद्यांपर्यंत किंबहुना ज्या ज्या लोकांकडून बेकायदेशीर कामे होत राहतात. त्या सर्वांशी पोलिसांचा संपर्क असतो आणि त्यांच्या कृपाछत्राखालीच हे अवैध धंदे सुरू राहतात. म्हणजे ज्या पोलीस यंत्रणांनी कर्तव्य आणि जबाबदारी म्हणून सर्वसामान्य नागरीकाचे हित जपण्याची आवश्यकता आहे. त्याऐवजी बेकायदेशीर किंवा अवैध व्यवसाय करणाऱ्यांना पोलिसांकडून अधिक संरक्षण मिळते म्हणूनच अशा प्रकारचे व्यवसाय किंवा धंदे खुलेआमपणे सुरू राहतात. सरकारने फुगेवाडीच्या प्रकरणात आठ जणांना अटक केलेली आहे. परंतु तेवढ्यावर सरकारची जबाबदारी संपत नाही. या प्रकाराला ज्यांचे संरक्षण होते. म्हणजे ज्यांनी जाणीवपूर्वक या प्रकाराकडे कानाडोळा केला. अशांचेदेखील निलंबन होण्याची आवश्यकता आहे. या हत्याकांडामध्ये तेदेखील तितकेच दोषी ठरतात.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

जोपर्यंत आयुष्य तुम्हाला एकटे उभे राहायला भाग पाडत नाही, तोपर्यंत तुम्हाला तुमच्या सामर्थ्याची जाणीव होत नाही.

**पंचांग**



**शनिवार, ३० मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ शुक्ल चतुर्दशी**
**नक्षत्र : विशाखा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०६-३८ तूळ**
**०६-३९ ते २४-०० कृत्तिका**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१०**

**पौर्णिमा प्रारंभ सकाळी ११.५७; गोवा राज्य दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### ज्वारीचा ढोकळा



★ **साहित्य :** १/२ कप ज्वारीचे पीठ, १ कप रवा, १/२ कप दही, १ कप पाणी, १/२ कप कोथिंबीर बारीक चिरून, १ टीस्पून आले-मिरचीची पेस्ट, १/२ टीस्पून हळद पावडर, इनो किंवा खायचा सोडा- १ छोटा चमचा, चवीनुसार मीठ, १ वाटी तेल. फोडणीसाठी- मोहरी- १ चमचा, जिरे- १ चमचा, पांढरे तीळ-१ चमचा, कढीपत्ता- ८-१० पाने, तेल- २ चमचे.

★ **कृती :** एका मोठ्या मिक्सिंग बाऊलमध्ये ज्वारीचे पीठ, रवा आणि दही चांगले मिसळा. हळूहळू पाणी घाला आणि एकही गुठळी न राहता एकसारखे मिश्रण होईपर्यंत मिसळा. हे मिश्रण १५ मिनिटे झाकण लावून भिजण्यासाठी ठेवून द्या. त्यानंतर त्यात कोथिंबीर, हळद, मीठ, मिरची-आले पेस्ट आणि थोडे तेल घाला. नीट ढवळून घ्यावे. तुम्हाला आवडत असल्यास तुम्ही यात बारीक चिरून भाज्या, गाजर, वटाणाही टाकू शकता. आता तुम्हाला एका भांड्यात जेवढे पीठ पाहिजे तेवढेच पीठ घ्या आणि त्यात इनो आणि मीठ मिसळा. प्लेटला तेलाने ग्रीस करा आणि त्यावर पीठ घाला. समान रीतीने पसरवा. वरून थोडी तिखट भुरभुरा. कुकर किंवा स्टीमरमध्ये पाणी उकळायला ठेवा आणि हे भांडे त्यात ठेवा (कुकरला शिट्टी व रबर लावू नका) मध्यम आचेवर १५ ते २० मिनिटे ढोकळा वाफवून घ्या. ढोकळा शिजला की नाही हे पाहण्यासाठी सुरी किंवा टूथपिक टोचून पाहा. ती स्वच्छ बाहेर आली तर ढोकळा तयार आहे. तो थंड होऊ द्या. एका छोट्या कढईत २ चमचे तेल गरम करा. त्यात मोहरी, जिरे, तीळ, आणि कढीपत्ता घालून तडतडू द्या. ही खमंग फोडणी तयार ढोकळ्यावर पसरा. ढोकळा चौकोनी तुकड्यांमध्ये कापून घ्या.

## क्रीडा

# सिंगापूर ओपन! सिंधू उपांत्यपूर्व फेरीत पराभूत

## सात्विक-चिरागची उपांत्य फेरीमध्ये धडक

**सिंगापूरमध्ये झालेल्या सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत भारताची ऑलिम्पिक पदक विजेती आणि बॅडमिंटन स्टार पी.व्ही. सिंधूला पुन्हा एकदा निराशेचा सामना करावा लागला. सिंगापूर ओपनमध्ये आन से यंगने दमदार कामगिरी करत तिला अवघ्या ४८ मिनिटांत पराभूत केले. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात सिंधूला यंगकडून २१-१७, २१-१४ असा पराभव पत्करावा लागला. या विजयासह आन से यंगने उपांत्य फेरीत प्रवेश केला. तिचा सामना चेन यू फेई आणि टोमोका मियाझाकी यांच्यातील सामन्याच्या विजेत्याशी होईल.**



■ नवी दिल्ली

**सिंधूने** जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या खेळाडू आन से यंगला सामन्यात टक्कर देण्याचा प्रयत्न केला, पण तिला एकही गेम जिंकता आला नाही. आन से यंगच्या आक्रमक खेळापुढे सिंधू टिकू शकली नाही. आन से यंगने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवत पहिल्या गेममध्ये ११-७ अशी आघाडी घेतली. सिंधूने जोरदार पुनरागमन करत स्कोअर १३-१४ वर आणला. यंगने लगेचच आघाडी घेत स्कोअर १८-१३ असा केला. तिने पहिला गेम २१-१७ असा जिंकला. दुसऱ्या गेममध्येही भारतीय स्टार सिंधूची कामगिरी सुमार होती. यंगने तिच्या बॅकहँड आणि धारदार शॉट्सने तिला सातत्याने अडचणीत आणले. या गेममध्ये दक्षिण कोरियन खेळाडूने आपला अव्वल दर्जा सिद्ध केला. सिंधूने मागील गेममध्ये १७ गुण मिळवले होते, पण दुसरा गेम ती १४-२१ ने हरली.

या स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या अव्वल पुरुष दुहेरी जोडीने संघर्षपूर्ण विजय मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत सात्विक आणि चिराग यांनी एक गेमने पिछाडीवर असताना पुनरागमन करत मलेशियाच्या खाई शिंग कांग आणि रॉन ताई यांच्यावर एक तास पाच मिनिटे चाललेल्या चुरशीच्या लढतीत १९-२१, २१-१७, २१-१३ असा विजय मिळवला. भारतीय जोडीचा सामना आता कोरियाच्या अव्वल मानांकित किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे यांच्याशी होईल, ज्यांनी सातव्या मानांकित जपानी जोडी ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी यांचा २१-१९, २१-१८ असा पराभव केला.

# ठाणे स्कायरायझर्स संघाच्या अधिकृत जर्सीचे अनावरण

■ मुंबई

**मुंबई** क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या आगामी महिला टी-२० मुंबई लीगसाठी ठाणे स्कायरायझर्स संघ सज्ज झाला. या संघाच्या अधिकृत जर्सीचे मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. वांद्रे-कुर्ला संकुल येथील मुंबई क्रिकेट असोसिएशनमध्ये झालेल्या या सोहळ्यात विहंग सरनाईक, अनाहिता विहंग सरनाईक, संघाची कर्णधार सायमा ठाकोर हिच्यासह सर्व खेळाडू आणि प्रशिक्षक उपस्थित होते.

ठाण्यातील पहिल्या महिला क्रिकेट संघाची घोषणा या निमित्ताने करण्यात आली असून, या सोहळ्याची सुरुवात एका विशेष व्हिडिओ सादरीकरणाने झाली. याप्रसंगी खेळाडूंना आणि आयोजकांना शुभेच्छा देताना प्रताप सरनाईक यांनी महिला क्रीडा क्षेत्रातील




या उपक्रमाचे कौतुक केले. हा संघ केवळ ठाण्याचे प्रतिनिधित्व करणार नाही, तर महिला क्रिकेटमधील नव्या पर्वाची सुरुवात करेल. ठाण्यातील महिला खेळाडूंना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकण्याची संधी याद्वारे मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# सोलापुरात ५ जून रोजी राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षा

■ पुणे

**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या वतीने आणि भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने ५ जून २०२६ रोजी राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले. सोलापूर येथे होणाऱ्या या परीक्षेमुळे राज्य परीक्षा पास झालेल्या पंचांना राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी या परीक्षेबाबत माहिती दिली. जिल्ह्यातील जास्तीत जास्त राज्य पंच परीक्षा उत्तीर्ण पंचांनी राष्ट्रीय परीक्षेला बसावे आणि राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपली नाव नोंदणी २ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पूर्ण करावी. यासाठी प्रशांत पाटणकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री माँ विद्यालयला नमवून कुलकर्णी अकादमीने विजेतेपद पटकाविले

■ मुंबई

**माहुल,** चेंबूर येथे झालेल्या १९ वर्षांखालील मुलांच्या परिवर्तन चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट अकादमी संघाने श्री माँ विद्यालय संघावर ७ विकेटने दणदणीत विजय मिळवून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

निर्धारित ३५ षटकांच्या या सामन्यात श्री माँ विद्यालय संघाने प्रथम फलंदाजीचा घेतलेला निर्णय चांगलाच फसला. प्रभंजन पाताडे (११ धावांत ४ बळी) आणि संचित कदम (२१ धावांत ४ बळी) यांच्या भेदक गोलंदाजीसमोर त्यांचा डाव ३२.४ षटकांतच केवळ ११५ धावांत गारद झाला. आग्रेय आदी याने १९ चेंडूंत सहा चौकर आणि एक षटकार ठोकत सर्वाधिक ३८ धावांची खेळी केली तर सागर गुप्ता (२०), ऋग्वेद जाधव ( नाबाद १०), आर्यन कुमार (१८) यांनाच दोन आकडी धावा करता आल्या. या तुटपुंज्या आव्हानाचा पाठलाग करताना सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट अकादमी संघाने १८.१ षटकांतच ३ बाद ११६ धावा करून विजेतेपदाला गवसणी घातली. लक्ष्य झवरने ३३ चेंडूंतच नाबाद ६१ धावांची तडाखेबाज खेळी करताना ५ चौकार आणि ५ षटकारांची आतषबाजी केली. त्याला आदित्य मुळे (१६) आणि अथर्व अधिकारी (१८) यांनी मोलाची




साथ दिली. अंतिम सामन्यातील आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून प्रभंजन पाताडे (७ बळी) याची निवड करण्यात आली. स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाज लक्ष्य झवर, सर्वोत्कृष्ट गोलंदाज म्हणून ध्रुव ब्रीद, तर सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून यष्टीरक्षक सागर गुप्ता (श्री माँ विद्यालय) यांना गौरविण्यात आले.

# बाल गोपाळ-आयडियल कॅरम सेंटरला प्रतिसाद

■ मुंबई

**बाल** गोपाळ मित्र मंडळ आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने काळेवाडी-काळाचौकी परिसरात कॅरमप्रेमी स्व. दशरथ चव्हाण स्मृती बाल गोपाळ-आयडियल कॅरम सेंटरचा शुभारंभ शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण, कॅरम मार्गदर्शक सचिन शिंदे, क्रीडाप्रेमी सुनिल नागवेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या उपक्रमाला परिसरातील शालेय मुलामुलींचा उत्तम प्रतिसाद लाभला होता. आयडियल शालेय क्रीडा चळवळीमधील कॅरम खेळासाठी नवोदित कॅरमपटूचा सहभाग वाढविण्यासाठी गेली दशकभर विविध मोफत कॅरम उपक्रमाद्वारे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आयडियल ग्रुप कार्यरत आहे.

# आशिया फुटबॉल पात्र स्पर्धेमध्ये भारताची उझ्बेकशी सलामीची लढत

■ ताश्कंद

**उझबेकिस्तानच्या** ताश्कंदमध्ये २५ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या २० वर्षांखालील वयोगटातील एएफसी आशिया फुटबॉल चषक पात्र फेरी स्पर्धेमध्ये भारताचा सलामीचा सामना उझ्बेकसोबत होणार आहे. या पात्र फेरीच्या स्पर्धेतील ड्रॉ काढण्यात आला असून, भारत 'ब' गटात आहे. या गटात उझ्बेक, सीरिया आणि बांगलादेश यांचा समावेश आहे. सदर स्पर्धेतील सामने एकेरी राऊंडरॉबिन पद्धतीने खेळविले जातील. आता एएफसी २० वर्षांखालील वयोगटातील आशिया चषक पात्र फेरीची फुटबॉल स्पर्धा नव्या स्वरुपात घेतली जाणार आहे. ही स्पर्धा दोन टप्प्यात होईल. या नव्या पद्धतीनुसार बढती आणि पदावनत्ती असे दोन टप्पे राहतील.

# फिफा विश्वचषकासाठी अर्जेंटिनाचा संघ जाहीर

**ब्युनोस आयर्स-** गतविजेत्या अर्जेंटिनाने फिफा विश्वचषकासाठी आपल्या अंतिम २६ सदस्यीय संघाची घोषणा केली. या संघाचे नेतृत्व पुन्हा एकदा महान फुटबॉलपटू मेस्सी करणार असून, तो आपला सहावा विश्वचषक खेळणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको येथे होणाऱ्या या स्पर्धेत अर्जेंटिना सलग दुसरे विजेतेपद पटकावण्याच्या उद्देशाने सहभागी होईल. मेस्सीला इंटर मियामीकडून खेळताना दुखापत झाली.

# सरस्वती कन्या, श्री सह्याद्री, शिर्सेकर महात्मा, श्री समर्थ उपांत्य फेरीत



■ मुंबई

**मुंबई** महापौर चषक खो-खो स्पर्धेत आज खेळवण्यात आलेल्या पुरुष आणि महिला व व्यावसायिक गटातील सामन्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. या स्पर्धेला शिवाजी पार्क परिसरातील क्रीडाप्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिला. या स्पर्धेत सरस्वती कन्या, श्री सह्याद्री, विद्यार्थी, शिर्सेकर महात्मा, श्री समर्थ, सरस्वती स्पो. अ. भि. गोरेगावकर, महात्मा गांधी, ओम युवा यांनी उपांत्य फेरीत धडक दिली.

महिलांच्या उपांत्यपूर्व सामन्यात सरस्वती कन्या संघाने ओम युवा स्पोर्ट्स क्लबचा १२-२ (मध्यंतर १२-१०) असा १ डाव व २ गुणांनी धुव्वा उडवत पराभव केला. या सामन्यात सरस्वती स्पोर्ट्स क्लबच्या जानवी लोंढे (६, १.३० मि. संरक्षण व ८ गुण), सेजल यादव (१.१० नाबाद, २.१० मि. संरक्षण), खुशबू सुतार (१.५० मि. संरक्षण व २ गुण) व वैधवी बटावले व काजल दिवेकर (प्रत्येकी १.४० मि. संरक्षण) यांनी दमदार विजय मिळवून दिला.

महिलांच्या उपांत्यपूर्व सामन्यात श्री सह्याद्री संघाने ओम साईश्वर सेवा मंडळाचा ८-६ (मध्यंतर ८-४) असा १ डाव व २ गुणांनी दणदणीत पराभव केला.

या सामन्यात श्री सह्याद्री संघाच्या आर्या भटकर (नाबाद ४, १.३०मि. संरक्षण) तन्वी थेराडे (२.४०, ३.१० व ४ गुण) ग्रीष्मा माईन (२.१०, १.५० व २ गुण) वैदेही कुंभार (२.२०मि. संरक्षण) या सामन्यात ॐ साईश्वरच्या वैष्णवी परब (४ मि. संरक्षण व २ गुण), दीक्षिता कानेरकर (१.३० मि. संरक्षण), रिया कदम, प्रांजल पाठक (प्रत्येकी १ मि. संरक्षण) यांना संघाला विजय मिळवून देता आला नाही.

# गोव्यात मेगा गृहप्रकल्पांना कुडतरी ग्रामस्थांचा विरोध

■ पणजी

**दक्षिण** गोवा जिल्ह्यातील कुडतरी मतदारसंघात मायना भागात प्रस्तावित चार मेगाप्रकल्पांच्या मुद्द्यावरून वातावरण तापले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. महाप्रकल्पांच्या विरोधात सरपंच सौम्य भूमिका घेत असल्याचा आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.या पार्श्वभूमीवर संतप्त ग्रामस्थांनी आमदार अलेक्स रेजिनाल्ड लोरेन्सो यांची भेट घेत गावात कोणत्याही परिस्थितीत महाप्रकल्प होऊ देणार नसल्याचा इशारा दिला.



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

यावेळी शेतकऱ्यांना मदतीच्या मुद्द्यावरून आमदार आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्सो आणि माजी जिल्हा पंचायत सदस्य मुरियानो रिबेलो यांच्यात शब्दिक चकमक उडाली.'तुम्ही आमदार झाल्यानंतर मदत केली असेलः पण मी कोणतेही पद नसतानाही शेतकऱ्यांसाठी काम करत आहे, अशी टीका मुरियानो रिबेलो यांनी करताच बैठकीत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.यासंदर्भात ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आमदार लॉरेन्सो यांची भेट घेऊन आपल्या मागण्या आणि चिंता त्यांच्यासमोर मांडल्या. सामाजिक कार्यकर्त्यांनीही य प्रकरणात ग्रामपंचायतीच्या भमिकेवर नाराजी व्यक्त केली प्रस्तावित प्रकल्पांविरोधात पंचायत प्रशासनाकडून अपेक्षित तीव्र भूमिका घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला.

देश विदेश

# अमेरिकेत भारतीयाला अटक ग्राहकाला मारहाणीचा आरोप

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेत** राहणाऱ्या भारतीय नागरिक धवल अमरभाई पटेल याला एका ग्राहकावर बेसबॉल बॅटने हल्ला केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. ही घटना मॅसॅच्युसेट्स राज्यातील एका दारूच्या दुकानात घडली.

पोलिसांच्या माहितीनुसार, धवल पटेल ज्या दुकानात काम करत होता. तेथे त्याचा एका ग्राहकाशी वाद झाला. वाद वाढल्यानंतर त्याने बेसबॉल बॅटने त्या ग्राहकावर हल्ला केला. या प्रकरणात वॉर्सेस्टर पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्यावर घातक शस्त्राने हल्ला आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभागाने सांगितले की, धवल पटेल अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहत होता. स्थानिक प्रशासनाने अधिकाऱ्यांना माहिती न देता त्याला तुरुंगातून सोडले होते . त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याला पुन्हा ताब्यात घेतले. या प्रकरणानंतर अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतर आणि स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

# ब्रिटनमधील हत्या प्रकरणात भारतीय वंशाच्या मुलासह आईही दोषी

■ लंडन

**ब्रिटनमध्ये** राहणाऱ्या भारतीय वंशाच्या विक्रम दिग्वा या तरुणाला १८ वर्षीय विद्यार्थ्याची चाकूने हत्या केल्याप्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवले. या प्रकरणात त्याची आई किरण कौर हिलाही पुरावे लपवण्यास मदत केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, २३ वर्षीय विक्रम दिग्वाने दक्षिण-पूर्व इंग्लंडमध्ये रात्री घरी परतत असलेल्या हेन्री नोव्हाक या विद्यार्थ्यावर चाकूने पाच वार केले. आरोपीने आत्मसंरक्षणासाठी हे कृत्य केल्याचा दावा केला होता. तसेच धार्मिक कारणांमुळे चाकू बाळगत असल्याचेही त्याने सांगितले. मात्र न्यायालयाने हे दावे फेटाळत त्याला हत्येचा दोषी ठरवले. तपासात स्पष्ट झाले की, घटनेनंतर आरोपीने मदत मागण्याऐवजी संपूर्ण घटनेचा व्हिडिओ तयार केला. त्यानंतर त्याची आई किरण कौर हिने घटनास्थळावरून चाकू व इतर पुरावे लपवण्याचा प्रयत्न केला.

**चाकूने हत्या केल्याचा आरोप**

# गुण असूनही सुवर्णपदक नाकारले जोधपूरचा कायद्याचा विद्यार्थी हायकोर्टात

■ जोधपूर

**जोधपूरमधील** नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीत अनुज शुक्ला या विद्यार्थ्याने त्याला सुवर्णपदक नाकारल्याप्रकरणी राजस्थान उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. एलएलएमचा विद्यार्थी अनुजला दीक्षांत समारंभाच्या काही मिनिटे आधी दोन सुवर्णपदके दिली जाणार नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयात पोहोचले.

अनुज शुक्ला हा २०२३-२४ बॅचचा एलएलएम (आयपीआर लॉज) विद्यार्थी आहे. त्याने सर्वाधिक गुण मिळवल्यामुळे त्याची दोन सुवर्णपदकांसाठी निवड झाली होती. विद्यापीठाच्या सुवर्णपदक समितीने आणि शैक्षणिक परिषदेनंही त्याच्या नावाला मंजुरी दिली होती. पदकांवर त्याचे नाव कोरले होते आणि अधिकृत माहितीपत्रकातही त्याचा उल्लेख केला होता. मात्र, फेब्रुवारी २०२५ मधील दीक्षांत समारंभ सुरू होण्याच्या काही मिनिटे आधी परीक्षा नियंत्रकांनी त्याला पदके दिली जाणार नसल्याचे सांगितले. त्याने एका विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केल्याचे कारण देण्यात आले. अनुजच्या म्हणण्यानुसार, पुनर्मूल्यांकनानंतर त्याचे गुण कमी झाले होते.

# आयटीची नोकरी सोडून शेती करणाऱ्या बंगळूरूच्या तरुणाचा वीज पडून मृत्यू

■ बंगळुरू

**बंगळूरू** येथील रोशन बालकृष्ण या तंत्रज्ञाचा म्हैसूरजवळ वीज पडून मृत्यू झाला. त्याने काही काळापूर्वी आयटी क्षेत्रातील नोकरी सोडून शेती व्यवसायात पाऊल ठेवले होते. रोशन हा कोडगू जिल्ह्यातील हेरावनाड गावचा रहिवासी होता. तो यापूर्वी आयटी क्षेत्रात काम करत होता. मात्र शेतीची आवड असल्याने त्याने कॉर्पोरेट नोकरी सोडून आधुनिक शेती उपकरणांच्या शेती सुरू केली होती.

रोशन पत्नी आणि मुलासह म्हैसूरमधील येलवालाजवळील शेतावर गेला होता. यावेळी तो आंबे तोडण्यासाठी शेतात गेला असताना अचानक त्याच्यावर वीज कोसळली. या घटनेत त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्यासोबत असलेली आणखी एक व्यक्ती जखमी झाली, मात्र तिची प्रकृती सुरक्षित असल्याचे सांगितले जात आहे. रोशनच्या निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.

# केनियातील शाळेच्या हॉस्टेलला आग! १६ विद्यार्थिनींचा मृत्यू

■ नैरोबी

**केनियामधील** नकुरु काउंटीच्या गिलगिल भागातील उतुमिशी गर्ल्स अकॅडमी या मुलींच्या शाळेच्या हॉस्टेलला पहाटे साडे तीन वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्घटनेत १६ विद्यार्थिनींचा मृत्यू झाला असून ७४ विद्यार्थिनी जखमी झाल्या आहेत. जखमी विद्यार्थिनींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

पहाटे हॉस्टेलच्या शयनकक्षात अचानक आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. सुरुवातीला १० विद्यार्थिनींच्या मृत्यूची माहिती होती. मात्र गंभीर भाजलेल्या आणखी सहा विद्यार्थिनींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.




अनेक विद्यार्थिनींची प्रकृती अजूनही गंभीर असल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर प्रशासनाने विद्यार्थिनी, शिक्षक आणि मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांसाठी समुपदेशनाची व्यवस्था केली आहे. केनियाचे राष्ट्राध्यक्ष विल्यम रुटो यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून सरकारकडून सर्व प्रकारची मदत केली जात असल्याचे सांगितले.

**७४ जखमी**

# भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद

भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा जन्म १ ऑक्टोबर १९४५ कानपूर जिल्ह्यात डेरापूर तालुक्याच्या परौंखे या छोट्या गावात झाला. रामनाथ कोविंद यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण खानपूर येथे झाले. रामनाथ कोविंद यांचे शिक्षण बी.कॉम., एल.एल.बी. असून त्यांनी सुमारे १६ वर्षे दिल्ली उच्च न्यायालयात आणि काही काळ सर्वोच्च न्यायालयात वकिली केली आहे. १९७७ मध्ये रामनाथ कोविंद यांनी तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे खासगी सचिव म्हणून काम पाहिले. १९९१ साली त्यांनी रीतसर भारतीय जनता पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व घेतले आणि





त्याच वर्षी कानपूर - नगर क्षेत्रातल्या घटमपूर मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढविली. परंतु ते पराभूत झाले. त्यापाठोपाठ झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत कानपूर ग्रामीण क्षेत्रातल्या भोगनीपूर मतदारसंघातून ते उभे राहिले, पण निवडून येऊ शकले नाही. पुढे १९९४ साली त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पुढे, २००० साली ते दुसऱ्यांदा राज्यसभेवर निवडून गेले. त्यांची विद्वत्ता आणि अभ्यासू वृती राज्यसभेत होत असलेल्या चर्चेच्या वेळी दिसून येत होती. ते स्वतः विणकर समाजातले असल्याने त्यांनी दलितांचे आणि शोषितांचे अनेक प्रश्न धसास लावले आहेत. दलितांसाठीच्या अनेक उच्चाधिकार समितीवर काम केले आहे. काही काळ त्यांनी भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणूनही जबाबदारी सांभाळली.

लखनौचे डॉ. आंबेडकर विश्वविद्यालय आणि कोलकाताची *Indian Institute of Management* अशा महत्त्वपूर्ण शिक्षणसंस्थाच्या गव्हर्निंग बॉडीवर ते होते. संयुक्त राष्ट्रसंघात त्यांना कुठल्याशा विषयावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देखील मिळाली होती. भारताचे राष्ट्रपती होण्याआधी ते बिहारचे राज्यपाल म्हणून काम पाहत होते.

# पंढरपुरात पोलीस व्हॅनचा अपघात! तिघे गंभीर जखमी

■ पंढरपूर

**पंढरपूर-मंगळवेढा** रस्त्यावर आरोपींना न्यायालयात घेऊन जाणाऱ्या पोलीस व्हॅनचा अपघात झाला. या अपघातात पोलिस व्हॅनच्या चालकासह तिघेजण जखमी झाले.

पोलीस व्हॅनचा टायर फुटल्याने हा अपघात झाला. टायर फुटल्याने व्हॅनने दुचाकी आणि कारला धडक दिली. त्यानंतर व्हॅन रस्त्याच्या कडेला जाऊन झाडीजवळ आदळली.या अपघातात पोलीस व्हॅनचे मोठे नुकसान झाले. या धडकेत दोन नागरिक गंभीर जखमी झाले असून व्हॅनचा चालकही जखमी झाला आहे. व्हॅनमध्ये असलेल्या आरोपींना तातडीने दुसऱ्या वाहनातून न्यायालयात रवाना करण्यात आले. अपघातानंतर काही काळ पंढरपूर-मंगळवेढा मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

# बुलेट ट्रेनमध्ये कॅन्टीन नसणार वेंडिंग मशीनद्वारे खाणे-पिणे सोय

**मोबाईलवरुन ऑर्डर करण्याची सोय**

■ मुंबई

**मुंबई-अहमदाबाद** बुलेट ट्रेनमध्ये पारंपारिक पॅन्ट्री कार म्हणजेच स्वयंपाकघर उपलब्ध नसणार आहे. त्याऐवजी प्रवाशांना खाण्या-पिण्याची सुविधा देण्यासाठी या ट्रेनमध्ये स्वयंचलित वेंडिंग मशीन बसवल्या जाणार आहेत.त्यासाठी प्रवाशांना मोबाईल पद्वारे एका क्लिकवर जेवण आणि स्नॅक्स ऑर्डर करण्याची सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे.

रेल्वे बोर्डातील सूत्रांनी सांगितले की, ताशी ३२० किलोमीटर वेगाने धावणार्या या बुलेट ट्रेनमध्ये कमी प्रवासाचा कालावधी आणि धावण्याची वेगमर्यादा लक्षात स्वतंत्र पॅन्ट्री किंवा ऑनबोर्ड कॅटरिंग व्यवस्था करणे व्यवहार्य ठरणार नाही.त्यामुळे नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड व्हेंडिंग आधारित सेवा मॉडेलचा गांभीर्याने विचार करत आहे.

सध्या व्हेंडिंग मशीन्स हे एक अधिक चांगले आणि प्रवाशांच्या दृष्टीने सोप्पा असणारा पर्याय आहे. या व्हेंडिंग मशीन्समध्ये प्रवासा दरम्यान प्रवाशांना कॉल्ड्रिक्स, चहा, कॉफी आणि स्नॅक्स मिळण्याची शक्यता आहे. ही स्वयंचलित प्रणाली अधिक जलद सेवा देऊ शकणार आहे.५०८ किमी लांबीचा मुंबई - अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर मंबई (बीकेसी), ठाणे, विरार बोर्डसर, वापी, बिलिमोरा, सूरत, भरूच, वडोदरा, आनंद, अहमदाबाद आणे साबरमती या १२ स्थानकांमार्फत महाराष्ट्र आणि गुजरातला जोडेल.

# आता मुंबई अग्नीशमन दलाच्या ताफ्यात अत्याधुनिक उंच शिड्या

■ मुंबई

**३४ व्या मजल्यावरील आग विझविणे शक्य**

**वाढत्या** गगनचुंबी इमारती आणि आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर मुंबई अग्निशमन दलाच्या ताफ्यात लवकरच नव्याने ६४ मीटर ते अगदी १०४ मीटरपर्यंतच्या टर्नटेबल लॅडर अर्थात अत्याधुनिक शिड्या दाखल होणार आहेत.

या अत्याधुनिक शिड्यांच्या मदतीने थेट इमारतीच्या ३४ व्या मजल्यावरील आगीवर नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे. मुंबई अग्निशमन दलाच्या आधुनिकीकरणासाठी पालिकेने अर्थसंकल्पात मोठी तरतूद केली आहे. यात लिफ्ट सुविधा असलेल्या अत्याधुनिक शिड्या,२४ ते ४० मीटर उंचीचे हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म आणि २५० मीटर उंचीपर्यंत पाणी फवारू शकणारी वाहने आदींचा समावेश आहे. याशिवाय १०० ते १२५ मजल्यांपर्यंतच्या उत्तुंग इमारतींसाठी तब्बल १०४ मीटर उंचीची शिडी खरेदी करण्याची प्रक्रियाही सुरू आहे. सध्या अग्निशमन दलाकडे ३२ मीटर, ४० मीटर, ५५ मीटर, ६४ मीटर तसेच ९० मीटर उंचीच्या 'टर्न टेबल लॅडर' उपलब्ध आहेत. मात्र, ९० मीटर लॅडर वारंवार नादुरुस्त होत असल्याने उंच इमारतींमधील आग विझविताना अडचणी निर्माण होत होत्या.

# गांजाची शेती करण्याची परवानगी द्या कांदा शेतकऱ्याची अजब मागणी

■ पुणे

**बाजारभावातील** अनिश्चितता आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या जुन्नर तालुक्यातील सुनील उकिर्डे या कांदा उत्पादक शेतकऱ्याने प्रशासनाकडे धक्कादायक मागणी केली आहे. कांदा शेती आता परवडत नाही. तोटा भरून काढण्यासाठी आम्हाला गांजा लागवडीची परवानगी द्या, असे तहसीलदारांना दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

जुन्नर तालुक्यातील डिंगोरे येथील शेतकरी सुनील उकिर्डे यांनी २०२५-२६ हंगामात १० एकर क्षेत्रावर कांद्याची लागवड केली होती. या शेतीसाठी त्यांना प्रति एकर सुमारे १ लाख २० हजार रुपये खर्च आला. मात्र, शासनाने जाहीर केलेला १२.३५ रुपये प्रतिकिलो खरेदी दर अत्यंत कमी असल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे. उकिर्डे यांच्या मते, सध्याच्या बाजारभावामुळे एका एकरामागे ४० ते ४५ हजार रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. वाढता उत्पादन खर्च, मजुरी, खतांचे दर आणि वाहतूक खर्च यामुळे कांदा शेती करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.त्यामुळे किफायतशीर अशी गांजाची लागवड करण्याची परवानगी त्यांनी प्रशासनाकडे मागितली.

# नेत्यांचे मानधन कमी करा बागेश्वर बाबा यांचा सल्ला

■ नवी दिल्ली

**सोशल** मीडियावर नेहमी या ना त्या कारणाने चर्चेत राहणारे बागेश्वर धामचे बागेश्वर बाबा यांनी एका कार्यक्रमात इंधन संकटावर भाष्य केले. याप्रसंगी त्यांनी नेत्यांचे मानधन कमी करा आणि चार्टर्ड विमानांवर बंदी घाला, असा सल्ला सरकारला दिला.

राजकारण्यांकडून वापरल्या जाणाऱ्या चार्टर्ड विमानांना सर्वाधिक इंधन लागते. मात्र तरीही त्यांच्यावर बंदी घालण्याबाबत कोणी काही बोलत नाही.देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी नेत्यांनी आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे.सरकारने सर्वप्रथम नेत्यांचे मानधन कमी करावे आणि त्यांच्याकडून वापरल्या जाणाऱ्या चार्टर्ड विमानांवर तात्पुरती बंदी घालावी, असे बागेश्वर बाबा म्हणाले.

# बीकेसीतील सिटी पार्कच्या जागेवर एमएमआरडीए अधिकाऱ्यांचा डोळा

**वरुण सरदेसाईंचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

■ मुंबई

**मुंबईतील** बीकेसीच्या मध्यभागी असलेल्या तब्बल पाच एकर जागेवरील सिटी पार्क सर्वसामान्यांसाठी बंद आहे. एमएमआरडीए अधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या वापरासाठीच राखीव ठेवण्यात आल्याचा आरोप उबाठा आमदार वरुण सरदेसाई यांनी केला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

वरुण सरदेसाई यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, करदात्यांच्या पैशातून उभारण्यात आलेल्या विकासकामांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळणे अपेक्षित असताना बीकेसीमधील सिटी पार्कचा वापर केवळ एमएमआरडीए अधिकाऱ्यांसाठी होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे हा प्रकार अत्यंत चुकीचा आणि लोकशाहीविरोधी आहे. एमएमआरडीए आयुक्तांनी कोणत्या अधिकाराखाली या सार्वजनिक पार्कचा प्रवेश पूर्णपणे बंद केला? पुढे वरुण सरदेसाई म्हणाले की, करदात्यांच्या पैशातून उभारलेल्या सुविधा नागरिकांनाच वापरता येत नसतील तर त्या नेमक्या कोणासाठी आहेत? सार्वजनिक सुविधांचे रूपांतर अधिकाऱ्यांच्या बंदिस्त वसाहतीत करण्याचा निर्णय कोणी घेतला? बीकेसीसारख्या महत्त्वाच्या भागातील कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक जागेचा वापर मर्यादित स्वरूपात होत आहे.

# गोंदियात नवतपाचा कहर पारा ४६.१ अंशांच्या पार

■ गोंदिया

**नवतपाच्या** पाचव्या दिवशी गोंदिया जिल्ह्यात उष्णतेने रौद्ररूप धारण केले असून जिल्ह्याचे तापमान तब्बल ४६.१ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. सकाळपासूनच सूर्य अक्षरशः आग ओकत असल्याने आणि दुपारच्या वेळी वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे गोंदियावासी उकाड्याने प्रचंड हैराण झाले आहेत. या कडक उन्हामुळे दुपारच्या वेळेत बाजारपेठा, चौक आणि मुख्य रस्त्यांवर शुकशुकाट पडला आहे. या वाढत्या तापमानाचा सर्वाधिक फटका मजूर, शेतमजूर आणि वाहनचालकांना बसत असून नागरिकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने नागरिकांना दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचा आणि भरपूर पाणी पिण्याचा सतर्कतेचा इशारा दिला आहे.

# पूर्व अंबरनाथचा पाणीपुरवठा दर शुक्रवारी पूर्णपणे बंद

■ अंबरनाथ



**वाढते** तापमान आणि चिखलोली धरणातील घटत्या जलसाठ्यामुळे अंबरनाथ शहराच्या पूर्व भागात पाणीटंचाईचे मोठे संकट निर्माण झाले आहे. या भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या पाणीपुरवठा करणाऱ्या चिखलोली धरणाची पाणीपातळी कमालीची खालावली आहे. त्यामुळे आजपासून दर शुक्रवारी अंबरनाथ शहरातील पूर्व भागाचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे.

चिखलोली धरणातून दररोज अंबरनाथ पूर्व भागातील शिवाजीनगर, महालक्ष्मी नगर, आंबेडकर नगर, श्रीकृष्ण नगर आणि नवरे नगर या परिसरातील सुमारे ५० हजारांहून अधिक नागरिकांना ६ एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. गेल्या आठवड्यातच मजीप्राने धरणातील घटत्या पाणीसाठ्यामुळे पाण्याचे नियोजन कोलमडत असल्याचे सांगत पाणीकपातीचे संकेत दिले होते. त्यानुसार धरणातील पाणीसाठा पुढील काही महिने पुरवणे आवश्यक असल्याने अखेर प्रशासनाने या कपातीवर शिक्कामोर्तब केले आहे.अंबरनाथ ही स्वतःचे चिखलोली धरण असलेली जिल्ह्यातील एकमेव नगरपरिषद आहे.

सद्यस्थितीत संपूर्ण अंबरनाथ शहराला एकूण ८४ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जातो. यामध्ये बॅरेज धरणातून अर्थात उल्हास नदीतून ५६ दशलक्ष लीटर, एमआयडीसीकडून २२ दशलक्ष लीटर, तर चिखलोली धरणातून ६ दशलक्ष लीटर पाण्याचा पुरवठा होतो.मात्र, उन्हाची वाढती तीव्रता आणि पाण्याचे वेगाने होणारे बाष्पीभवन यामुळे चिखलोली धरणाची पाणीपातळी अत्यंत खालच्या पातळीवर पोहोचली आहे.

# खरातची चौकशी का थंडावली? दमानियांचा सरकारला सवाल



■ शिर्डी

**लैंगिक** शोषणाच्या आरोपामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेला स्वयंघोषित भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण गेल्या दोन महिन्यांपासून राज्यभरात गाजत आहे. मात्र प्रकरणाच्या तपासावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणातील एसआयटीची कारवाई थांबल्याचा आणि तपास थंडावल्याचा दावा करत वरून सर्व सेटिंग झाली आहे का? असा थेट सवाल त्यांनी सरकारला केला. गेल्या काही दिवसांपासून खरात प्रकरणातील तपासाबाबत कोणतेही अपडेट येत नाहीत. एसआयटीची कारवाई थांबल्याचे समजते.तपासाचे पुढे काय झाले याबाबत सरकारकडून कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. या प्रकरणात अनेक राजकीय व्यक्तींची नावे समोर आली होती, मात्र त्यांची चौकशी झाल्याचे दिसत नाही. एकनाथ शिंदे, आशिष शेलार, चंद्रकांत पाटील, जयंत पाटील, दीपक केसरकर यांच्यासह खरातशी संबंधित काही सहकाऱ्यांबाबतही पुढे काय कारवाई झाली, हे स्पष्ट नाही.





# रणवीर-फरहान वादात सलमानची मध्यस्थी

'डॉन ३' चित्रपटावरून अभिनेता रणवीर सिंग आणि चित्रपट निर्माते-दिग्दर्शक फरहान अख्तर यांच्यात निर्माण झालेला वाद मिटवण्यासाठी सुपरस्टार सलमान खान आता मध्यस्थ म्हणून पुढे आला आहे. चित्रपटसृष्टीतील या मोठ्या वादाला माध्यमांमध्ये मोठे स्वरूप येऊ नये आणि दोन्ही बाजूंच्या हितसंबंधांचे रक्षण व्हावे, यासाठी सलमान खानने वैयक्तिक स्तरावर पुढाकार घेतला आहे. रणवीर सिंगने 'डॉन ३' चित्रपटातून अचानक माघार घेतल्यामुळे हा वाद निर्माण झाला आहे. फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईजने रणवीरविरुद्ध असहकाराचा आदेश जारी केल्यामुळे हा वाद अधिक गंभीर बनला आहे. या वादात चित्रपटसृष्टी विभागली जात असल्याचे पाहून सलमान खानने दोघांमधील तणाव निवळण्यासाठी पाऊल उचलले आहे. त्याने रणवीर सिंग आणि फरहान अख्तर या दोघांशीही स्वतंत्रपणे फोनवरून सविस्तर संवाद साधला आहे. कोणत्याही तिसऱ्या पक्षाला किंवा कायदेशीर यंत्रणेला यात सामील न करता हा वाद आपापसात शांततेने मिटवावा, असा सल्ला सलमानने दोघांना दिला आहे. हा वाद निवळल्यानंतर भविष्यात दोघांनी मिळून एखाद्या दुसऱ्या प्रकल्पावर एकत्र काम करावे, अशी इच्छाही त्याने व्यक्त केली आहे. सलमानच्या या मध्यस्थीला दोन्ही बाजूंनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, ते आता जाहीर वाद टाळून थेट संवादाद्वारे मार्ग काढण्याचा विचार करत आहेत.

# 'है जवानी...'ला हिरवा कंदील

**दिग्दर्शक** डेव्हिड धवन यांच्या आगामी 'है जवानी तो इश्क होना है' या बहुप्रतिक्षित चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाकडून हिरवा कंदील मिळाला आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने या चित्रपटाला 'यू/ए' प्रमाणपत्र बहाल केले आहे. याचा अर्थ हा कौटुंबिक मनोरंजक चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांसाठी योग्य आहे. मात्र १२ वर्षांखालील मुलांसाठी पालकांचे मार्गदर्शन सुचवले आहे.

या चित्रपटाचा अंतिम मंजूर कालावधी १३६ मिनिटे म्हणजेच २ तास आणि १६ मिनिटे इतका निश्चित करण्यात आला आहे. वरुण धवन, मृणाल ठाकूर आणि पूजा हेगडे यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाची गाणी आणि शीर्षकामुळे आधीच प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. सेन्सॉर बोर्डाची मंजुरी मिळाल्यामुळे आता येत्या काही दिवसांत चित्रपटाच्या प्रसिद्धी मोहिमेला अधिक वेग येणार आहे.





# 'भारत भाग्य विधाता'चे मोशन पोस्टर रिलीज

**अभिनेत्री** कंगना राणावतची मुख्य भूमिका असलेल्या 'भारत भाग्य विधाता' या आगामी चित्रपटाचे अधिकृत मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. 'द अनसीन हिरोज' शीर्षकासह प्रदर्शित करण्यात आलेले हे मोशन पोस्टर देशातील अशा सामान्य नागरिकांना आणि पडद्यामागील वीरांना समर्पित आहे, ज्यांनी संकटाच्या काळात देवदूत बनून अनेकांचे प्राण वाचवले. हा चित्रपट येत्या १२ जून २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात कंगना राणौतसोबत गिरिजा ओक, स्मिता तांबे, अमृता नामदेव, ईशा डे, प्रिया बेर्डे, आशा शेलार, सुहिता थत्ते आणि रसिका आगाशे यांसारख्या तगड्या कलाकारांची फौज पाहायला मिळणार आहे. मनोरंजनापलीकडे जाऊन समाजातील खऱ्या नायकांना वंदन करणारा हा एक भावनिक आणि राष्ट्रभक्तीने प्रेरित असलेला चित्रपट असेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'शक्ती शालिनी'चे चित्रीकरण आटोपले

**मॅडॉक** फिल्म्सच्या अत्यंत लोकप्रिय हॉरर कॉमेडी युनिव्हर्समधील आगामी बहुप्रतिक्षित चित्रपट 'शक्ती शालिनी'चे चित्रीकरण मुंबईत यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. २७ मे २०२६ रोजी मुंबईतील पवई येथील चित्रार्थ स्टुडिओमध्ये या चित्रपटाच्या शेवटच्या भागाचे चित्रीकरण पार पडले. दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली या चित्रपटाचे चित्रीकरण मार्चमध्ये सुरू झाले होते. मध्य प्रदेशातील चंबळ, दतिया, अंत्री, पनिहार, ग्वाल्हेर, मोरेना आणि राजस्थानमधील धोलपूर व बारखंडी या भागांत यातील महत्त्वाच्या दृश्यांचे चित्रीकरण करण्यात आले आहे. पवईमधील स्टुडिओमध्ये चित्रपटाच्या क्लायमॅक्ससाठी राजस्थानमधील एका गावाचा भव्य सेट उभारण्यात आला होता, जिथे गावातील महिला असुरी शक्तींच्या पराभवाचा उत्सव साजरा करताना दाखवल्या आहेत.

'सायरा' चित्रपटातून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री अनीत पड्डा या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून, ती पहिल्यांदाच दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. ती 'शक्ती' आणि 'शालिनी' अशा दोन परस्परविरोधी भूमिका साकारत आहे. चित्रपटात अनीत पड्डासोबतच विशाल जेठवा आणि खलनायकाच्या भूमिकेत विनीत कुमार सिंग मुख्य भूमिकेत आहेत.



# मलायकाचा मन:शांती मंत्र

**अभिनेत्री** आणि नवउद्योजक मलायका अरोरा हिने सोशल मीडियावरील सततची टीका आणि ट्रोलिंगचा सामना करण्याबाबत एका मुलाखतीत अत्यंत स्पष्टपणे आपली मते मांडली आहेत. इंटरनेटचा आवाज नक्कीच मोठा असतो. परंतु ते नेहमीच शहाणपणाचे असते असे नाही, अशा शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावले आहे. वय आणि अनुभवासोबत मिळालेल्या समजूतदारपणामुळे आपल्याला या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करणे आणि स्वतःला शांत ठेवणे शक्य झाल्याचे तिने सांगितले.

या मुलाखतीत मलायकाने सार्वजनिक आयुष्यात वावरताना येणाऱ्या सततच्या दबावाविषयी आणि वैयक्तिक आयुष्यातील सीमा कशा निश्चित कराव्यात याबद्दल सविस्तर भाष्य केले. ती म्हणाली, तुम्ही तुमचे मानसिक स्थैर्य सतत लोकांच्या मतांवर अवलंबून ठेवले, तर तुम्हाला कधीही आंतरिक शांतता लाभणार नाही. मी माझ्या वास्तव जीवनावर, माझ्या कामावर, माझ्या जवळच्या माणसांवर आणि माझ्या रोजच्या दिनक्रमावर लक्ष केंद्रित करते. या गोष्टी मला मानसिक बळ देतात आणि जमिनीवर राहण्यास मदत करतात. बऱ्याचदा समोरच्या व्यक्तीने केलेली टीका ही तुमच्यापेक्षा त्याच्या स्वतःच्या मानसिकतेबद्दल अधिक सांगून जाते. आज मला मिळणारा आनंद मी स्वतः कोण आहे यावर आधारित आहे. त्यामुळे माझ्या वैयक्तिक आयुष्यावर कोणाशीही जाहीर चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, अशा शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावले आहे.

# नीट प्रकरणी सीबीआयच्या नांदेडात धाडी
## क्लास चालक, विद्यार्थी, पालकांची चौकशी

■ नांदेड

नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने नांदेडमध्ये मोठे धाडसत्र आणि चौकशी सुरू केली. वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा पेपर लाखो रुपये देऊन विकत घेतल्याच्या संशयावरून सीबीआयने नांदेडमधील अनेक संशयित पालक, विद्यार्थी आणि कोचिंग क्लासेसची कसून झाडाझडती घेतली जात आहे.

नांदेड शहरातील विद्युतनगर भागातील एका हॉटेल व्यावसायिकाच्या फ्लॅटवर सीबीआयने छापा टाकला. त्यांनी मुलीसाठी ५ ते १० लाख रुपये मोजून नीटचा पेपर खरेदी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी कुटुंबियांची तब्बल ८ तास कसून चौकशी करण्यात आली. सीबीआयचे पुणे येथील प्रमुख विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने शहरातील शिवाजी नगर आणि भाग्य नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या विद्यार्थिनींच्या घरी पोहोचले. मुलींनी पेपर कधी घेतला, पैसे कोणाला दिले आणि एजंट कोण होता, यासारख्या प्रश्नांचा भडीमार यावेळी करण्यात आला. सीबीआयच्या पथकाने नांदेडमधील प्रसिद्ध कोचिंग क्लासेसच्या कार्यालयांवर धाड टाकून तपास केला.

# एसी स्फोटामुळे घराला आग लागली
## निवृत्त आयएएस अधिकाऱ्यांचा मृत्यू

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** हौज खास परिसरात घराला लागलेल्या आगीत निवृत्त आयएएस अधिकारी धनेंद्र कुमार यांचा मृत्यू झाला. प्राथमिक तपासानुसार, एअर कंडिशनरच्या युनिटमध्ये झालेल्या स्फोटामुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. दुर्घटनेच्या वेळी घरात पाच जण उपस्थित होते. धनेंद्र कुमार यांच्या मुलावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अग्निशमन दलाच्या माहितीनुसार, रात्री ११.२४ वाजता हौज खास एन्क्लेव्ह येथील घराला आग लागल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तातडीने दोन अग्निशमन गाड्या घटनास्थळी पाठवण्यात आल्या. रात्री आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. आग ग्राउंड प्लस टू म्हणजेच तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावरील घरगुती सामान आणि पहिल्या मजल्यावरील लाकडी खिडक्यांपर्यंत पसरली होती.अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वीच पीसीआर कर्मचारी आणि स्थानिकांच्या मदतीने दोन जखमींना एम्स ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले होते.

# शिंदे गटात प्रवेश केलेल्या परांजपेंच्या
## म्हाडा नियुक्तीला राष्ट्रवादीचा विरोध

■ मुंबई

**शिंदे** गटात प्रवेश केलेले नेते आनंद परांजपे यांच्या म्हाडाच्या उपाध्यक्षपदावरील संभाव्य नियुक्तीला राष्ट्रवादी काँग्रेसकडून विरोध करण्यात आला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून त्यांची नियुक्ती थांबवण्याची मागणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

आनंद परांजपे यांना म्हाडाचे उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करू नये, अशी मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. तसेच या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लवकरच दुसरे नाव सुचवण्यात येईल, असेही पत्रात नमूद करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून आनंद परांजपे हे नाव राज्याच्या राजकारणात चर्चेत आहे. १४ मे रोजी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदांचा आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. विधान परिषदेचे तिकीट न मिळाल्याने ते नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यानंतर त्यांनी अधिकृतपणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला.या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना परांजपे यांनी परभणीत सांगितले की, मी १४ वर्ष राष्ट्रवादीचा कार्यकर्ता होतो. त्यामुळे त्यांनी पत्र दिले असले तरी माझ्या मनात कोणतीही कटुता नाही.आता मी शिवसेनेत स्वगृही परतलो आहे.

# श्रीकांत शिंदेंच्या शिवसंवाद मेळाव्यात
## मदतीसाठी आलेल्या वृद्धाचा मृत्यू

■ बीड



**खासदार** श्रीकांत शिंदे यांच्या केज दौऱ्यावेळी आयोजित शिवसंवाद मेळाव्यात मदतीच्या अपेक्षेने आलेल्या ७८ वर्षीय रसूल गफूर सय्यद यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. कार्यक्रमस्थळी झालेली गर्दी आणि वाढत्या उकाड्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास झाला.

रसूल यांच्या मुलाचा काही दिवसांपूर्वी पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. धरणात पडलेल्या आपल्या मुलीला वाचवण्यासाठी त्यांनी पाण्यात उडी घेतली होती. या घटनेत मुलीचा जीव वाचला, पण सय्यद यांच्या मुलाचा मृत्यू झाला. कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने सय्यद कुटुंब आर्थिक आणि मानसिक संकटात सापडले होते.त्यामुळे शासनाकडून काही मदत मिळावी, या अपेक्षेने रसूल सय्यद आपल्या कुटुंबासह श्रीकांत शिंदे यांच्या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी केज येथे आले होते.

# विनेश फोगाटला आशियाई क्रीडा स्पर्धांच्या
## निवड चाचण्यांत उतरण्याची परवानगी

■ नवी दिल्ली

**कुस्तीपटू** विनेश फोगाट हिला आशियाई क्रीडा स्पर्धांच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली असून त्याचवेळी न्यायालयाचे कठोर निरीक्षण नोंदवली आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिल्याने फोगाटला दिलासा मिळाला आहे. मात्र, उच्च न्यायालयाच्या निर्णयामागील कारणांवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. भारतीय कुस्ती महासंघाने दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि आलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर याचिका दाखल केली होती.

निवड चाचण्या ३० मेपासून सुरू होणार असल्याने अखेरच्या क्षणी प्रक्रिया थांबवणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. सर्व कुस्तीपटूंना समान नियम लागू असताना महासंघाच्या धोरणाला भेदभावपूर्ण कसे म्हणता येईल, असा सवाल न्यायालयाने केला. सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षणे नोंदवली की, मातृत्व आणि लैंगिक भेदभावासंदर्भातील निरीक्षणांवरही न्यायालयाने आक्षेप घेतला. केवळ या मुद्द्यांच्या आधारावर क्रीडा प्रशासनात न्यायालयीन हस्तक्षेप करता येणार नाही.

# महार वतन जमीन प्रकरणात
## एकनाथ खडसेंना अटकपूर्व जामीन

■ जळगाव



**जळगावच्या** भुसावळ तालुक्यातील मानपूर येथील महार वतन जमिनीच्या गैरव्यवहार प्रकरणात शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे आणि त्यांची मुलगी शारदा खडसे यांना दिलासा मिळाला आहे. भुसावळ न्यायालयाने दोघांनाही अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

मानपूर येथील रहिवासी चमेलाबाई तायडे यांनी एकनाथ खडसे आणि शारदा खडसे यांच्यावर गंभीर आरोप करत तक्रार दाखल केली होती. २००२ साली मानपूर येथील महार वतन जमीन (गट क्रमांक १२२२) तापी-पूर्णा सहकारी साखर कारखान्यासाठी घेण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आली आणि केवळ ५१ हजार रुपये टोकन देऊन जमीन बळकावण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या तक्रारीनंतर बोदवड पोलीस ठाण्यात एकनाथ खडसे आणि शारदा खडसे यांच्याविरोधात फसवणूक, कागदपत्रांत फेरफार तसेच अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# सारवरेच्या निर्यात बंदीमुळे
## कारखाने आर्थिक अडचणीत

**शेतकऱ्यांनाही झळ पोहोचण्याची भीती**

■ सातारा

**केंद्र** शासनाने साखर निर्यातीवर घातलेल्या बंदीमुळे राज्यातील साखर कारखाने आर्थिक अडचणीत सापडले आहेत. साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असताना निर्यातीवर निर्बंध आल्याने देशांतर्गत बाजारात साखरेचा अतिरिक्त साठा निर्माण होत आहे.परिणामी, साखरेचे दर दबावात आले असून, त्याचा थेट परिणाम साखर कारखान्यांच्या आर्थिक व्यवहारांवर होत आहे.

या परिस्थितीची झळ ऊसउत्पादक शेतकर्यांनाही होत असल्याने शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी केंद्र शासनाने तातडीने साखर निर्यात बंदी उठवावी,अशी मागणी केली आहे.साखरेची किमान विक्री किंमत ७ वर्षांपासून स्थिर असल्याने कारखान्यांच्या उत्पन्नावर मर्यादा आल्या. दुसरीकडे वीज, इंधन, कामगार, वाहतूक, दुरुस्ती आणि उत्पादन खर्चात वाढ होत असल्याने साखर उद्योग आर्थिक तणावाखाली आहे. वाढत्या खर्चाच्या तुलनेत साखरेचे दर वाढले नसल्याने अनेक कारखान्यांची आर्थिक गणिते कोलमडली आहेत.याचा परिणाम थेट ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारखान्यांची आर्थिक स्थिती कमकुवत झाल्यास शेतकऱ्यांच्या एफआरपीची देयके थकण्याचा धोका वाढणार असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

# उत्तर प्रदेशात वादळाचा कहर
## पूल कोसळून ६ मजुरांचा मृत्यू

■ हमीरपूर

**उत्तर** प्रदेशातील हमीरपूर जिल्ह्यात वादळामुळे निर्माणाधीन पुलाचा भाग कोसळला. या दुर्घटनेत ६ मजुरांचा जागीच मृत्यू झाला. उत्तर प्रदेशात काही दिवसांपासून हवामानात मोठे बदल होत असून, मान्सूनपूर्व पावसाने अनेक भागांना तडाखा दिला आहे.

काही ठिकाणी ताशी ९० किलोमीटर वेगाने वारे वाहत असून विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. या वादळामुळे अनेक घरांचे पत्रे उडून गेले आहेत. हमीरपूरमध्ये सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामादरम्यान वादळाचा वेग वाढला आणि पुलाचा मोठा भाग पत्त्याच्या घरासारखा कोसळला. दुर्घटनेच्या वेळी अनेक मजूर पुलावर काम करत होते. वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, मजुरांना सुरक्षितस्थळी जाण्याची संधीच मिळाली नाही.अपघातानंतर बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आतापर्यंत ६ मजुरांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

# चांदोलीच्या अभयारण्य परिसरात
## हजारो मोहक काजव्यांची रोषणाई


■ कोल्हापूर

**सह्याद्रीच्या** कुशीत वसलेल्या चांदोली अभयारण्य परिसरात सध्या रात्रीच्यावेळी काजव्यांची मोहक रोषणाई पाहायला मिळत आहे. पर्यटकांसाठी हा निसर्गानुभव आनंददायी ठरत आहे.

विशेषतः चांदोली धरण क्षेत्रात हजारो काजवे अंधारात लुकलुकताना दिसत आहेत. चांदोली परिसरात निसर्ग अभ्यासक प्रणव महाजन काजव्यांचा अभ्यास करत आहेत. त्यांनी सांगितले की, काजवे हे भुंग्यांच्या कुळातील कीटक असून जगभरात त्यांच्या सुमारे दोन हजार प्रजाती आढळतात.भारतात केवळ नऊ ते दहा प्रजाती आढळून येतात.

पावसाळ्यात मादी काजवा साधारण शंभर अंडी घालते.ही अंडी झाडांच्या खोडामध्ये, पाणथळ जागेजवळ किंवा उंच गवताळ भागातील पालापाचोळ्यात ठेवली जातात.काजव्यांची अंडी आणि अळी दोन्ही अंधारात चमकण्याची क्षमता ठेवतात. साधारण दोन आठवड्यांत अंड्यातून अळी बाहेर पडते आणि तिच्या संघर्षमय जीवनाची सुरुवात होते. या अवस्थेत अळ्या विविध लहान-मोठे किडे,शेतीस हानिकारक कीटक, अळ्या तसेच गोगलगायी यांचे भक्षण करतात.वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर त्या कात टाकतात.

# नवाकाळ शब्दकोडे-१६२१



**आडवे शब्द –**

२. घोडे बांधायची जागा ४. समाजमान्य ७. खेळण्याचे मैदान ९. चवळई १०. जनावर ११. दाण्याचे साल १३. सोय, प्रबंध १५. अळूची पातळ भाजी १८. दुधावरची साय १९. पाणी, आप २०. पांढऱ्या रंगाची कंदभाजी, हिची कोशिंबीर देखील करतात. २१. शेंगेचे कवच २३. करवंटी २४. दुरवस्था, वाईट स्थिती २५. भांडण, बोलाचाली २७. अवांतर, इतर २९. पिठल्याचा प्रकार ३१. काठ, किनारा ३३. सच्चा, प्रामाणिक ३४. सोबत ३६. चंद्र ३९. ठोंब्या, मूर्ख ४०. पराक्रमाचे स्फुरण ४२. आर्त हाक ४३. पुष्टी ४५. सारखा, समान ४६. विक्रेता व ग्राहक यांच्यातील वाटाघाटी ४८. विश्वास, खात्री ४९. लांब अंतरावर ५०. चहाडी, चुगली ५१. गळ्यातील मण्यांची पोत ५३. सूर्यापासून सर्वात नजीकचा ग्रह ५४. श्रीकृष्णाचे भूपाळीतले एक नाव ५६. आक्षेप ५८. गुंडाळी, बिछाना ६०. हल्या, टोणगा ६१. संकोची, बुजरा ६३. शत्रू ६४. धर्मशाळा ६६. ढग ६७. उत्पन्न, आय ६८. काष्टा ६९. स्वार्थी ७१. श्वासोच्छवास ७४. अमृत ७६. सलगी ७८. उंटाच्या नाकातली कडी ७९. उत्कर्ष, चलती ८०. शत्रूवर छुपा हल्ला करणारा ८२. गोव्यामधील एक देवी ८३. हलक्या प्रतीचा हिरा ८५. धांदल, घाई ८७. आक्रमण, चढाई ८८. रस्ता ९१. पुष्कळ, खूप ९३. वेतन ९५. हताशपणाची भावना ९७. पैशांची थैली ९९. कुबेराची राजधानी १०१. सरशी १०२. इच्छा, आस १०३. उपवासाला चालणारा गोडसर कंद १०५. मुक्कामी येणे १०६. उपकृत १०७. धमकावणी १०८. भविष्यातील

**उभे शब्द –**

१. भोंदूगिरी २. तळतळून दिलेले शिव्याशाप ३. त्रासलेला, वैतागलेला ४. लहान मूल ५. संभाषण ६. त्वचेवर लावण्याचे औषध ७. कडीपाट, तक्तपोशी ८. निवृत्तीनाथांचे गुरू १०. पावलांचा आवाज १२. सैन्याची तुकडी १४. नुकसान, तोटा १५. नावाची पाटी १६. भेग १७. शुक्राचार्यांची कन्या २०. मोत्यांचा घेरा असलेली नथ २२. भेद, अंतर २६. व्याकूळ २८. व्याघ्रगर्जना २९. बागुरडा ३०. बांबू उभा चिरून काढलेली पातळ काठी ३२. अस्थिर ३३. कारकुनी ३५. लेप, स्तर ३७. वार्धक्य ३८. थडगे ४१. विष्णू ४४. अर्धवर्तुळाकार महिरप ४५. आप्त, नातलग ४७. शेवयांसारखा दिसणारा राजस्थानी गोड पदार्थ ४९. क्षीर ५०. अंतःकरण ५१. अनेक याअर्थाने वापरला जाणारा आकडा ५२. घोटाळा, गोंधळ ५३. औषधी वनस्पती ५४. साबुदाण्याचा तळलेला पदार्थ ५५. मालदार ५६. हिरडा ५७. कुशल, पटू ५९. श्रम ६०. रेषा, रेखा ६२. कणखर, मजबूत ६३. शत्रुत्व ६५. देव ६६. कुशाग्र बुद्धी ७०. आरोळी, गर्जना ७२. सर्वजण ७३. झुकलेला ७४. सोपे, सुलभ ७५. तपस्वी, ऋषी ७७. न शिजलेला टचटचीत दाणा ७९. पारितोषिक ८०. अरुंद रस्ता, बोळ ८१. तंगडी ८३. उपाय ८४. मांजर ८५. लुब्ध ८६. गचांडी ८७. आरूढ ८९. अर्धचंद्र ९०. आश्रय ९१. खोरे ९२. नाथांचा मंत्र-xxx निरंजन ९३. प्रतिष्ठा ९४. सुंदर तरुणी ९५. संगीतातला सातवा स्वर ९६. विद्येची देवता ९७. मुद्दाम, मनाविरुद्ध ९८. योग्य, उचित ९९. नखरा १००. आदला दिवस १०१. जगणे १०४. झोपडीचे दार •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२० चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. साद्यंत ४. आदिमाता ७. ओतप्रोत १०. भागीरथी ११. रुसवा १२. वरचढ १४. सुरा १५. दाभण १६. सरशी १८. सहनशील २०. पथकर २२. पक्का २३. तारक २५. नवल २६. गुण २७. साईबाबा २९. हास्य ३२. पाप ३३. सुर ३४. राणी ३५. पत्रकार ३७. ठेंगणा ३८. चूर ३९. मेज ४०. पाणी ४१. कर्ज ४२. कूप ४३. हय ४४. पुलाव ४५. मान्यता ४७. सूतोवाच ४८. शील ४९. नीरा ५०. सामील ५२. बखर ५३. पड ५४. कडा ५६. काप ५८. तख्त ५९. सूड ६०. परवाना ६२. दहन ६४. जबाब ६५. तोकडा ६७. जप ६८. चक्का ६९. समई ७०. शबल ७२. चक्की ७३. भरवसा ७५. मुनी ७६. कस ७८. दडपण ८०. दाव ८१. ठसका ८२. विलाप ८३. गर्दी ८४. रचयिता ८६. क्षमा ८७. बल ८९. टक ९१. रजनीकर ९४. कलागत ९६. पखवाज १००. साठी १०१. तनसडी १०३. डूल १०४. गजानन १०५. फाशी १०६. वणवा १०७. यार

**उभे शब्द** : १. भगीरथ २. साथीदार ३. तरुणपण ४. आवास ५. मावशी ६. तार ७. ओढ ८. प्रोत्साहन ९. कराल १३. चतुर १४. सुशील १७. रजई १९. नवरात्र २०. पक्षी २१. कच्चा २३. ताबा २४. कहाणी २६. गुपचूप २७. सारमेय २८. बाड ३०. धार ३१. तंगडतोड ३४. राणीवसा ३५. पर्जन्य ३६. काथ्या ४०. पाला ४१. कमाल ४२. कूच करणे ४३. हलका ४४. पुरातन ४५अ. ताबडतोब ४६. ओरखडा ४७. सूप वाजणे ५१. मीराबाई ५५. डावा ५७. पद ६१. नाचक्की ६३. हजर ६४. जम ६६. कलकलाट ६९. ससा ७०. शनी ७१. धोंड ७२. चणचण ७३. भव ७४. वस्ती ७५. मुकाबला ७७. सपक ७८. दर्दी ७९. पर ८०. दातार ८१. ठमा ८३. गळेपडू ८५. चानी ८६. क्षर ८८. लगत ९०. किंवा ९२. जरा ९३. कळशी ९४. कठीण ९५. तनया ९७. खल ९८. जग ९९. दिन १००. साव १०२. सर

## गोपाळगड किल्ल्यावर 'आंब्या'वरून राडा! मालकीचा वाद पुन्हा चिघळला

**प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह**

■ गुहागर

**गुहागरमधील** ऐतिहासिक गोपाळगड किल्ल्यावर दोन आंबे उचलल्याच्या कारणावरून पर्यटकांना किल्ल्याचा मुख्य दरवाजा लावून डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार घडला. या घरानेमुळे किल्ल्याच्या मालकीचा वाद पुन्हा चिघळला आहे.

या घटनेमुळे, किल्ल्याच्या मालकीचा प्रश्न पुन्हा एकदा अत्यंत गंभीर वळणावर येऊन पोहोचला आहे.या प्रकारानंतर संपूर्ण गुहागर तालुक्यात तीव्र संताप व्यक्त होत असून, स्थानिकांमध्ये वाद उफाळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही पर्यटक गोपाळगड किल्ल्याला भेट देण्यासाठी आले होते. किल्ल्याच्या आवारात असलेल्या झाडावरून त्यांनी केवळ दोन आंबे उचलले. मात्र, याच गोष्टीचा राग अनावर होऊन किल्ल्यात आंब्याची बाग चालवणाऱ्या व्यक्तीने थेट किल्ल्याचे गेट लावून पर्यटकांना आतच रोखून धरले आणि त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. हा किल्ला आमच्या खाजगी मालकीचा आहे, असा दावा यावेळी बाग चालवणाऱ्या व्यक्तीने केला. या अरेरावीला पर्यटकांनीही चोख उत्तर दिले. गोपाळगड किल्ला हा सरकारी आहे, म्हणूनच आम्ही आंबे उचलले. जर ही तुमची खाजगी जागा आहे, तर तुम्ही किल्ल्याबाहेर तसा तुमच्या नावाचा बोर्ड का लावला नाही? असा संतप्त सवाल पर्यटकांनी उपस्थित केला. यावरून दोन्ही बाजूंमध्ये मोठी हुज्जत झाली. गेल्या वर्षीच सरकारने हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला होता. असे असतानाही पुन्हा एकदा खाजगी मालकीचा दावा सांगत पर्यटकांना धमकावल्याने प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## भीमाशंकर मंदिराचे मुख्य सभामंडपाचे काम अपूर्ण! ३१ मेचा मुहूर्त हुकणार

■ पुणे

**श्री** क्षेत्र भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी पुन्हा खुले करण्यासाठी प्रशासनाने दिलेला ३१ मेचा मुहूर्त आता हुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मंदिराच्या मुख्य सभामंडपाचे पुनर्बांधणीचे काम अद्याप अपूर्ण असून परिसरातील राडारोडा हटवणे, पायऱ्यांचे काम आणि दगडी बांधकामाची अंतिम प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणखी १० ते १५ दिवस लागणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे भीमाशंकरचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना जूनच्या मध्यापर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर आणि परिसराचा मोठ्या प्रमाणावर विकास करण्यात येत आहे. सुमारे २८८ कोटी रुपयांच्या निधीतून विविध विकासकामे सुरू असून, मंदिर परिसराचा संपूर्ण कायापालट करण्याचे काम सुरू आहे.

## शहापूरमध्ये रारवाडी कार्यक्रमात अन्नातून २२ जणांना विषबाधा

■ ठाणे

**शहापूर** तालुक्यातील किन्हवलीजवळील शिळ गावात राखाडी कार्यक्रमादरम्यान अन्नातून विषबाधा झाली. २२ जणांना मळमळ, उलट्या, ताप आणि जुलाबाचा त्रास झाल्याने त्यांना तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

तीन दिवसांपूर्वी निधन झालेल्या व्यक्तीच्या राखाडी कार्यक्रमासाठी (स्मशानातून चितेची राख घेऊन येणे) आलेल्या पाहुण्यांसाठी दुपारी जेवण तयार करण्यात आले होते. दुपारी अनेकांनी हे अन्न सेवन केले. त्यांना कोणताही त्रास झाला नाही. कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणात अन्न शिल्लक राहिले होते.

संध्याकाळी अन्न वाया जाऊ नये या हेतूने जवळचे नातेवाईक, भावकी आणि शेजाऱ्यांना बोलावून




तेच उरलेले जेवण देण्यात आले. हे अन्न खाल्ल्यानंतर काही वेळातच अनेकांना मळमळ, उलट्या, ताप आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे गावात एकच खळबळ उडाली.

## रिझर्व्ह बँक देशात प्लास्टिक नोटा चलनात आणणार

पान १ वरून

झाल्या होत्या.

देशात सध्या डिजिटल पेमेंट मोठ्या प्रमाणात केले जात आहे. एक-दोन रुपयांच्या वस्तुसाठीही ग्राहक डिजिटल पेमेंटचा पर्याय वापरतात. परंतु तरीही रोख व्यवहारांचे प्रमाण कमी झालेले नाही. अजूनही व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणावर रोखीत व्यवहार करणे पसंत करतो. १५ मेपर्यंतच्या आकडेवारीनुसार देशातील एकूण चलनी नोटांचे प्रमाण वर्षभरात ११.५ टक्क्यांनी वाढून ४२.८६ लाख कोटी रुपयांवर गेले आहे. चालू वित्तीय वर्षाच्या पहिल्या दीड महिन्यातच बाजारातील रोख रकमेत १.१५ लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. यावरून रोख पैशांची मागणी किती प्रचंड आहे, हे स्पष्ट होते.

## नोंदीनुसार ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे द्या जरांगे-पाटलींची विखे यांच्याकडे मागणी

पान १ वरून

अशी जरांगेंची मागणी आहे. त्यात आपण एक एसओपी तयार केली आहे. एकूण नोंदींची संख्या १२लाख आहे. आत्तापर्यंत अडीच लाख प्रमाणपत्र दिली आहेत. समिती गठित दाखल झाल्यानंतर ६१ हजार प्रमाणपत्र दिली आहेत. ६६८ आंदोलकांवर गुन्हे होते, त्यापैकी ५६७ गुन्हे मागे घेतले आहेत. उर्वरित गुन्हे प्रलंबित असून तेही मागे घेण्यात येतील. शहिदांच्या कुटुंबांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. कुटुंबातील मुलांना एसटी महामंडळात अनेकांना नोकऱ्या दिल्या होत्या. काही मुलांनी या नोकऱ्या नाकारल्या आहेत. हैदराबाद गॅझेटचे प्रकरण कोर्टात असल्याने सातारा गॅझेट लागू करता येत नाही.

जरांगे यांनी सरकारचे सगळे दावे खोडून काढले. सरकारने स्वतःच कुणबी नोंदीची संख्या ५८ लाख सांगितली आहे. मात्र यातील ३०८ जणांना प्रमाणपत्रे दिली आहेत. त्याही नोंदी जुन्याच आहेत. इतरांना अधिकारी प्रमाणपत्रेच दिली देत नाहीत. कारण त्यांना थेट मुख्यमंत्र्यांचे तसे आदेश आहेत. आता तुम्ही १२ लाख नोंदी सांगता आहात. मग ५८ लाख नोंदी कुठे गेल्या? ती नावे मला द्या. गॅझेटनुसार अर्ज येत नाही, असे खोटे सांगू नका. तुमच्याकडे नोंदींची आकडेवारीही नाही. हैदराबाद गॅझेटचे प्रकरण कोर्टात आहे. मग १९९४ चा जीआर कसा निघाला. एकाला एक न्याय, दुसर्‍याला दुसरा कसा? नाहीतर १९९४ च्या जीआरला स्थगिती द्या. इडब्लूएसच्या विद्यार्थ्यांना कुठेही सवलत नाही. स्वतंत्र मंत्रालय नाही. सर्व आंदोलकर्त्यांवरील गुन्हे मागे घेतलेले नाही. ते तत्काळ मागे घ्या.

## कुलूप हातात घेऊन रोहित पवारांची सीआयडीच्या कार्यालयामध्ये धडक

पान ८ वरून- पण अजितदादांच्या प्रकरणाला चार महिने उलटूनही तपास सीबीआयकडे देण्यात आलेला नाही. पुढे रोहित पवार म्हणाले की, आज सीआयडी कार्यालयात भेट दिली असता जबाबदार अधिकारी भेटले नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांकडून केवळ गोलमाल आणि बेजबाबदार उत्तरे मिळाली. अधिकारी काहीच काम करत नसतील तर त्यांच्या खर्चाचा बोजा सरकारने का सहन करावा? आज केवळ टाळे दाखवले आहे. पुढच्या वेळी येथे आलो, तर खर्च कमी करण्याच्या पंतप्रधानांच्या आवाहनानुसार सीआयडी कार्यालयाला कुलूप ठोकल्याशिवाय राहणार नाही.

## कॅनडात भारतीय विद्यार्थिनीची निर्घृण हत्या

■ टोरंटो

**कॅनडात** शिक्षण घेत असलेल्या आणखी एका भारतीय विद्यार्थिनीची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विधी कल्पेशभाई मेघानी (२२) असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. विधी मूळची गुजरातच्या आणंद जिल्ह्यातील बोरसाद गावात रहात होती. गेली चार वर्षे शिक्षणानिमित्त ती कॅनडामध्ये वास्तव्यास होती.

## नीट प्रकरणी पंतप्रधान लक्ष ठेवतील! कोर्टात सरकारचे आश्वासन

पान १ वरून- व्यवस्थेला अधिक मजबूत करण्यासाठी आयआयटी, युजीसी, सीबीएससी यांसारख्या संस्थांतील तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांनी प्रश्न उपस्थित केला की, शिफारसींच्या अंमलबजावणीवर प्रत्यक्ष किती देखरेख झाली आणि पेपर लीक कसा झाला? विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी अशा प्रकारे खेळ होऊ नये, हे खूपच त्रासदायक आहे. यात विद्यार्थ्यांचे भावनिक आणि वर्षानुवर्षांचे परिश्रम गुंतलेले असतात. सुप्रीम कोर्टाने युपीएससी परीक्षेचे उदाहरण देत सांगितले की अशा संस्था या प्रकारच्या घटनांपासून मुक्त आहेत. उच्चस्तरीय समिती असूनही जर अशी घटना घडत असेल, तर शिफारसींच्या अंमलबजावणीत किंवा मूळ व्यवस्थेत गंभीर त्रुटी आहेत. उच्चस्तरीय समितीचे प्रतिनिधित्व करणारे माजी इस्त्रो प्रमुख डॉ. राधाकृष्णन यांनी सांगितले की एकूण १०१ शिफारसी देण्यात आल्या आहेत. त्यापैकी ६० शिफारसी या अल्पकालीन स्वरूपाच्या असून २०२५-२६ च्या परीक्षांसाठी लागू करण्यासाठीच्या आहेत. अनेक सुधारणा आधीच लागू करण्यात आल्या आहेत, तर काहींवर काम सुरू आहे. परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित करण्यात आली आहे.


UVAL Lighting The Future

**उरवी डिफेन्स ॲण्ड टेक्नोलॉजी लिमिटेड**
**(पूर्वीची उरवी टी ॲण्ड वेज लॅम्प्स लिमिटेड)**
सीआयएन: L84220MH2004PLC145760
पत्ता: दुकान क्र. ३२१, ऑव्हियर, निर्मल गॅलेक्सी, ला.ब.शा. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८० भारत.
दूर. क्र.: +९१ २२ २५६५ १३५५, ईमेल आयडी: info@uravilamps.com, वेबसाईट: www.uravilamps.com

**दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता लेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा सारांश**
(₹ लाखात प्रति भाग उत्पन्न वगळता)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | एकत्रित | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेले विद्यमान त्रैमासिक (लेखापरिक्षित) | ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित) | ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेले सुसंगत त्रैमासिक (लेखापरिक्षित) | ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेले विद्यमान त्रैमासिक (लेखापरिक्षित) | ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित) |
| १ | एकूण उत्पन्न | १,०६८.०३ | ४,०४९.२० | ९३६.५४ | १,०४०.२५ | ३,९८६.२५ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपूर्व #) | ३२.८१ | १७८.४४ | ९४.३१ | ६९.९३ | १५८.२७ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपश्चात #) | ३२.८१ | १७८.४४ | ९४.३१ | ६९.९३ | १५८.२७ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपश्चात #) (एकत्रित आकडे असल्यास, रकमेमध्ये सहयोगी कंपनीकडून नफ्यामधील हिस्सा समाविष्ट) | २१.७२ | १३१.७ | ६४.२१ | ५८.८४ | १११.५४ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (नफा/(तोटा) समाविष्ट) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) | १८.५८ | १३३.४९ | ५७.७७ | १४४.८४ | २११.०९ |
| ६ | इक्विटी समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रति भाग) | १,१४०.०० | १,१४०.०० | १,१२६.०० | १,१४०.०० | १,१४०.०० |
| ७ | राखीव (पूनर्मुल्यांकित राखीव वगळता) | - | - | - | - | - |
| ८ | प्रतिभाग उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी) (अखंडीत आणि खंडीत प्रचलनाकरिता) | | | | | |
| | १. मूळ | ०.१६ | १.१६ | ०.५८ | ०.५२ | ०.९२ |
| | २. सौम्यीकृत | ०.१६ | १.१६ | ०.५७ | ०.५२ | ०.९२ |

टीपाः
१. वरील विवरणपत्र सेबी (सूचिबद्धता आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार प्रारुपाचा सारांश आहे. त्रैमासिक/वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारुप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईट्स म्हणजेच https://www.bseindia.com आणि https://www.nseindia.com वर आणि कंपनीची वेबसाईट www.uravilamps.com उपलब्ध आहे.
२. दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहामाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. २८ मे, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले आहेत.
३. वित्तीय निष्कर्ष कंपन्यांचे (भारतीय लेखा मानके)(सुधारणा) नियमन, २०१८ सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अन्वये विहीत केल्यानुसार भारतीय लेखा मानके (आयएनडी एएस)च्या अनुपालनात बनविण्यात आले आहेत.
४. लेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्र वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या वैधानिक लेखा परिक्षकाद्वारे पुनरावलोकित केले आहेत.

उरवी डिफेन्स ॲण्ड टेक्नोलॉजी लिमिटेडकरिता आणि त्यांच्या वतीने
(पूर्वीची उरवी टी ॲण्ड वेज लॅम्प्स लिमिटेड)
सही/-
कौशिक गडा
पूर्णवेळ संचालक आणि सीएफओ
डीआयएन: ००५१५८७६

दिनांक: ३०.०५.२०२६
ठिकाण: मुंबई

रामेश्वर मीडिया


### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या, कोणत्याही धारणाधिकार किंवा कोणत्याही स्वरुपाच्या कोणत्याही बोज्यापासून मुक्त जागा ("सदर जागा") **श्री. अखिल अनिल कपूर आणि सौ. पूनम अनिल कपूर** यांच्याकडून खरेदीकरिता पूर्वग्रहरहित आधारावर बोलणी करीत आहेत.

सदर जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध किंवा संदर्भात वारसा, ताबा, अभिहस्तांकन, भेट, भाडेपट्टी, परवाना, भाडेकरू, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, वहिवाट, विक्री, हस्तांतरण, गहाणवट, देवाणघेवाण, कर्ज, अग्रीम, कायद्याच्या कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण किंवा लवादाद्वारे मनाई हुकूम किंवा कोणत्याही हुकूम, आदेश किंवा निवाड्याअंतर्गत किंवा कोणत्याही सामंजस्य करार/करारपत्र/करारनामा/मुखत्यार पत्रांतर्गत, कोणत्याही खटल्यामध्ये किंवा अन्यथा उपस्थित, किंवा इतर कोणताही हक्क किंवा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, उपरोल्लेखितपैकी कशाच्याही आधारे किंवा अन्यथा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, हितसंबंध किंवा दावा असणाऱ्या सर्व व्यक्ती किंवा व्यक्तींनी त्याबाबत त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना खाली दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर, सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांमध्ये सूचित करणे आवश्यक आहे. तसेच नोंद घ्यावी की, जर दावा न केल्यास, आमचे अशील सदर जागेच्या खरेदीकरिता **श्री. अखिल अनिल कपूर आणि सौ. पूनम अनिल कपूर** यांच्याशी पूर्वग्रहरहित बोलणी पूर्ण करतील आणि सदर जागेमधील असा कोणताही कथित दावा किंवा हक्क किंवा हितसंबंध सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिला असे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलावर बंधनकारक नसेल.

**वरील उल्लेखित अनुसूची**

सदनिका क्र. ५२०२ - ए विंग, वर्ल्ड व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, दि वर्ल्ड टॉवर्स, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई - ४०००१३ व त्यासह २ कार पार्किंग जागा.

श्री. चिराग सांचेती
भागीदार
मे. बुलवर्क सॉलिसिटर्स
३०५/३०७, वेंकटेश चेंबर्स, घनश्याम तळवटकर मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
ठिकाणः मुंबई दिनांकः ३०.०५.२०२६

## पुणे-पिंपरीत हातभट्टीच्या दारूने ४८ तासांत १३ जणांचा मृत्यू

पान १ वरून

पांडुरंग फुगे यांचा मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे झाला. तर विजय आणि राजेंद्र या दोन सख्ख्या भावांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचा अंदाज आहे. राजेंद्र राजपूत यांचा बाथरूममध्ये चक्कर येऊन पडल्याने मृत्यू झाला. पाचपैकी चार मृतांना दारूचे कोणतेही व्यसन नव्हते आणि त्यांनी हातभट्टीची दारू प्यायली नव्हती. या सर्व प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी करत असून, शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होईल.

यासंदर्भात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी महापौर योगेश बहल म्हणाले की, परिसरात अवैध हातभट्टीची दारू सर्रास विकली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अशा घटनांकडे दुर्लक्ष करणारे पिंपरी-चिंचवड पोलीस कधी जागे होणार ? या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणाची दखल घेत म्हटले की, माझे पुणे पोलीस आयुक्तांशी बोलणे झाले आहे. कुठल्या ठिकाणी हातभट्टीची दारू तयार झाली हे पोलिसांनी शोधून काढलेले आहे. याच्या पाठीमागे जे लोक आहेत त्यांना अटक केली आहे. आणखी काही लोक यात असू शकतात. ते शोधण्याचे काम सध्या सुरू आहे. ज्यांची प्रकृती गंभीर आहे त्यांना उपचार करून वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे. ज्या ठिकाणी हे सर्व तयार झाले त्याच्या पाठीमागे कोण-कोण आहेत हे पोलीस शोधून काढत आहेत. आतापर्यंत आठ लोकांना अटक झाली आहे. अजून काही लोकांना अटक होऊ शकते. या प्रकरणातील संपूर्ण साखळी शोधून त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल. कारण ही एक प्रकारे हत्याच आहे. दरम्यान शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी हडपसर परिसरात मृतांच्या घरी भेट देऊन त्यांच्या कुटुंबांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांसह संबंधित दारूच्या गुत्त्यावर जाऊन त्याची तोडफोड करत राज्याच्या गृहखात्याकडे अवैध दारू विक्रीवर कारवाईची मागणी करत सरकारवर टीका केली.

### नेत्यांचे सोंग

हातभट्टीची दारू कुठे बनते हे पोलिसांना माहीत असते, ही दारू खुलेआम विकली जाते, जेव्हा मृत्यूची घटना घडते तेव्हा नेते सखोल चौकशीचे आदेश देतात, गुत्त्यांची तोडफोड करण्याची नाटके करतात, पण ज्या पोलिसांच्या नाकाखाली आणि त्यांच्या पूर्ण आशीर्वादाने ही विक्री चालते त्यांना कधीच हात लावत नाहीत . हातभट्टीची दारू स्वस्त असल्याने कुटुंबही कधी तक्रार करीत नाही, महाराष्ट्रात गावोगावी ही विक्री सुरु आहे. आज मृत्यू झाल्याने चौकशीचे नाटक करून मामला थंड होईल .

नवा काळ
• पुणे । शनिवार ३० मे, २०२६ • पान -८

# शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी १ कोटींचा सोन्याचा मुकूट



**शिर्डी -** शिर्डीच्या साईदरबारात लखनौ येथील साईभक्त गोविंद गोयल यांनी साईबाबांना तब्बल एक कोटी रुपयांहून अधिक किमतीचा सुवर्ण मुकूट अर्पण केला आहे. मध्यान्ह आरतीदरम्यान गोविंद गोयल आणि त्यांच्या परिवाराने भक्तिभावाने हा मुकूट साईबाबांच्या चरणी समर्पित केला. या सुवर्ण मुकुटाचे वजन सुमारे ७८२ ग्रॅम असून, सध्याच्या बाजारभावानुसार त्याची किंमत अंदाजे १ कोटी १० लाख रुपये असल्याची माहिती देण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली असली तरी साईभक्तांकडून सोन्याच्या वस्तू, दागिने आणि मौल्यवान भेटवस्तू अर्पण करण्याची परंपरा कायम आहे.

# कुलूप हातात घेऊन रोहित पवारांची सीआयडीच्या कार्यालयामध्ये धडक

■ पुणे

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेला चार महिने पूर्ण झाले असूनही तपासात कोणतीही ठोस प्रगती होत नसल्याचा आरोप करत अजित पवारांचे पुतणे आणि शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आज पुण्यातील सीआयडी कार्यालयात हातात कुलूप घेऊन पोहोचले. त्यांनी अधिकाऱ्यांना इशारा दिला की, पुढील काळातही तपासात प्रगती झाली नाही तर सीआयडी



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कार्यालयाला हे कुलूप ठोकले जाईल.

याबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले की, अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूला चार महिने झाले तरी सीआयडीचा तपास पुढे सरकत नाही. हा तपास घातपाताच्या दिशेने जाऊ नये म्हणूनच सीआयडीकडे देण्यात आला का? अशी शंका आता निर्माण होत आहे. एएआयबीचा अहवाल अद्याप आलेला नाही आणि सीआयडी त्याच अहवालाकडे बोट दाखवून स्वतःची जबाबदारी टाळत आहे. अभिनेता सुशांत सिंह राजपूत मृत्यू प्रकरणात दोन दिवसांत सीबीआय चौकशी जाहीर झाली होती.

» पान ७ वर

# जामीन रद्द करण्याची कारणे द्या सुधा भारद्वाज यांची कोर्टाला विनंती

■ मुंबई

**एल्गार** परिषद प्रकरणी अटक करण्यात आलेल्या सामाजिक कार्यकर्त्या सुधा भारद्वाज आणि सहआरोपी वरवरा राव यांचा जामीन रद्द करण्याची मागणी राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) विशेष पीएमएलए न्यायालयाकडे केली होती. त्यावर आपले मत मांडण्यापूर्वी एनआयए कोणत्या आधारावर आपला जामीन रद्द करण्याची मागणी करत आहे याची संपूर्ण माहिती आपल्याला द्यावी, अशी विनंती सुधा भारद्वाज यांनी केली.

न्यायालयाने भारद्वाज यांची विनंती मान्य करून जामीन रद्द करण्याची मागणी कोणत्या कारणांनी करत आहात याची पुराव्यांसह माहिती एका पेनड्राईव्हवर भारद्वाज यांना देण्याचे आदेश न्यायालयाने एनआयएला दिले. या प्रकरणी पुढील सुनावणी १०

**एल्गार परिषद प्रकरण**

जून रोजी होणार आहे. एनआयएचा असा आरोप आहे की, १९ जानेवारी रोजी मुंबई प्रेस क्लबच्या टेरेसवर एल्गार परिषद प्रकरणातील आरोपी आनंद तेलतुंबडे, अरुण परेरा, रोना विल्सन, सुधीर ढवळे, हनी बाबू, वर्नन गोन्साल्विस आणि गौतम नवलखा यांची एक गुप्त बैठक झाली होती. या बैठकीला सुधा भारद्वाज आणि वरवरा राव हजर होते.

# भाजपा खासदाराच्या निवेदनांवर मुख्य सचिवांच्या ४१ बैठका!

**१ ते ४ जून दरम्यान बैठकांचे आयोजन**

■ मुंबई

**नांदेडसह** मराठवाड्यातील विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केलेल्या निवेदनांवर त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य शासन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तब्बल ४१ उच्चस्तरीय बैठका घेणार आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी १ ते ४ जून दरम्यान या बैठकांचे आयोजन केले आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने आढावा बैठका घेण्याचा हा नवा विक्रमच आहे.

खासदार डॉ. गोपछडे यांनी सादर केलेली सर्वाधिक ५१ निवेदने आरोग्य विभागाशी संबंधित आहेत. गृह विभागाशी संबंधित ४७ निवेदने आहेत. १ जून रोजी, २१ विभागांशी संबंधित बैठका सकाळी ११ ते दुपारी १ वाजेदरम्यान सात वेगवेगळ्या सत्रांत एकत्र केल्या जातील. २ जून रोजी आठ विभागांच्या बैठका सकाळी ११ ते दुपारी १२.१५ या वेळेत चार सत्रात होतील.

३ आणि ४ जून रोजी प्रत्येकी सहा विभागांच्या बैठका पुन्हा सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत घेतल्या जातील. अशा बैठकीवेळी संबंधित विभागांचे सचिव, तसेच संयुक्त आणि उपसचिव, आयुक्त, संचालक आणि जिल्हाधिकारी यांनी सविस्तर उत्तरांसह तयार राहणे अपेक्षित आहे.

# लूक आऊट सर्क्युलरमुळे 'जेट'च्या नरेश गोयलनी परदेशी जाणे टाळले

■ मुंबई

**मनी** लाँड्रिंगच्या गुन्ह्यातील आरोपी, जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांच्यावर बजावण्यात आलेली अनेक लूक आऊट सर्क्युलर अजून रद्द करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे न्यायालयाची परवानगी मिळूनही गोयल परदेशी जाणार नाहीत. गोयल यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात ही माहिती देण्यात आली.

गोयल यांना लंडनला जाण्याची परवानगी विशेष पीएमएलए न्यायालयाने १२ मे रोजी दिली होती. या निर्णयाला ईडीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवरील सुनावणीत गोयल यांच्या वतीने शपथपत्रावर ही माहिती देण्यात आली. गोयल यांच्या वतीने ज्येष्ठ वकील ॲड. आबाद पोंडा यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. गोयल यांच्याविरूद्ध जारी करण्यात आलेली सर्व लूक आऊट सर्क्युलर रद्द केल्याशिवाय ते परदेशी जाऊ इच्छित नाहीत, असे पोंडा यांनी सांगितले.

ईडीच्या वतीने ॲड. आशिष मेहता यांनी युक्तिवाद केला. गोयल यांना लंडनला जाण्यास परवानगी दिल्यास ते तेथून कायमस्वरुपी परागंदा होण्याची शक्यता आहे, असे सांगत मेहता यांनी गोयल यांना परदेशी जाण्याची परवानगी देण्यास विरोध केला.

# नाशिक धर्मांतर प्रकरणात दुसरे आरोपपत्र दाखल

■ नाशिक

**नाशिकमधील** टीसीएसमधील कथित लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणाच्या तपासात विशेष तपास पथकाने कारवाई करत नाशिक न्यायालयात दुसरे आरोपपत्र दाखल केले आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी दाखल आठ गुन्ह्यांमध्ये आठ संशयितांविरुद्ध दोन हजारांहून अधिक पानांचे आरोपपत्र सादर करण्यात आले आहे.

या प्रकरणातील संशयितांमध्ये सहा पुरुष आणि दोन महिलांचा समावेश असून, प्रत्येक गुन्ह्यासाठी स्वतंत्र आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मुंबई नाका पोलीस ठाण्यात रझा रफीक मेमन, शाहरुख हुसेन शौकत कुरेशी, अश्विनी अशोक चैनानी, तौसीफ बिलाल अत्तार, शफी भिखान शेख, दानिश एजाज शेख, निदा एजाज खान



आदींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते. एसआयटीने तपासादरम्यान सुमारे ५० साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक आणि डिजिटल पुरावे, गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या वस्तूंचा समावेश आरोपपत्रात करण्यात आला आहे. हे आरोपपत्र अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात दाखल करण्यात आले.

यापूर्वी २२ मे रोजी एसआयटीने देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्ह्यात दानिश एजाज शेख, तौसीफ बिलाल अत्तार, निदा एजाज खान आणि मतीन मजीद पटेल यांच्याविरुद्ध दीड हजार पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणात आरोपी निदा खानला आश्रय दिल्याच्या आरोपावरून ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे नगरसेवक मतीन पटेल यांची पोलिसांनी सुमारे नऊ तास चौकशी केली. पुन्हा १ जून रोजी पोलीस ठाण्यात हजर राहण्यास सांगण्यात आले.

# डेक्कन एक्स्प्रेसचे इंजिन बिघडले मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

■ मुंबई

**मुंबईहून** पुण्याकडे जाणारी डेक्कन एक्स्प्रेस आज सकाळी शेलू-नेरळ स्थानकांदरम्यान तांत्रिक बिघाडामुळे अचानक बंद पडली. त्यामुळे कामाला जायच्या वेळेत मध्य रेल्वेच्या डाऊन मार्गावरील वाहतूक तब्बल पाऊण तास विस्कळीत झाली. लोकल आणि एक्स्प्रेस गाड्यांचा खोळंबा झाला आणि प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.

डेक्कन एक्स्प्रेस सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास मुंबईहून पुण्याकडे निघाली होती. ही गाडी शेलू आणि नेरळ स्थानकांच्या दरम्यान आली असता तिच्या इंजिनात अचानक बिघाड झाला. इंजिन बंद पडल्याने गाडी मुख्य मार्गावरच थांबली आणि संपूर्ण रेल्वे वाहतूक खोळंबली. यामुळे मध्य रेल्वेच्या डाऊन मार्गावरील कर्जत-खोपोली लोकल सेवा विस्कळीत झाली. तर उद्यान एक्स्प्रेस वांगणी रेल्वे स्थानकामध्येच थांबली. गर्दीच्या वेळेत झालेल्या या बिघाडामुळे प्रवाशांची गैरसोय झाली.

# शाडूच्या गणेशमूर्तींसाठी ठाणे पालिका जागा देणार

■ ठाणे

**ठाणे** महापालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. पालिकेतर्फे शाडू माती गणेशमूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांना प्रायोगिक तत्त्वावर मोफत जागा आणि शाडूची माती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशा जागेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ जून आहे, अशी माहिती पालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी दिली.

आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले की, पालिकेच्यावतीने प्रायोगिक तत्त्वावर मोफत जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर जागांचे वाटप करण्यात येईल. यासाठी इच्छुक मूर्तिकारांनी संबंधित प्रभाग समिती कार्यालयाकडे १५ जूनपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत मिळालेल्या अर्जांची छाननी करून उपलब्धतेनुसार १५ जुलैपर्यंत जागा व शाडू माती मोफत उपलब्ध करून दिली जाईल. फक्त जागा उपलब्ध करून दिली जाणार असून शेड, वीज व पाणी यांसारख्या सुविधा मूर्तिकारांनी स्वतः उपलब्ध करून घ्यायच्या आहेत.

शाडू माती ठामपाच्या महिला बचत गट तसेच हवा प्रदूषण प्रयोगशाळा, वर्तकनगर येथे उपलब्ध करून दिली जाईल. जागेसाठी अर्ज करताना त्यात आपणच मूर्तिकार असल्याचे नमूद करावे लागेल. मूर्तीकारांनी त्यांच्या मंडपाबाहेर पर्यावरणपूरक मूर्ती उपलब्ध आहेत असा ३ बाय ८ फूट आकाराचा फलक लावणे आवश्यक आहे.

# शरद पवार गटाचे प्राजक्त तनपुरे आज भाजपात प्रवेश करणार

■ मुंबई

**राष्ट्रवादी** शरद पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा उद्या भाजपात पक्षप्रवेश होणार आहे. हा प्रवेश मुंबईतील नरिमन पॉईंट येथील भाजपा प्रदेश कार्यालयात दुपारी ३ वाजताच्या सुमारास पार पडणार असून, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. या पक्षप्रवेशानंतर त्यांना अहिल्यानगर विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तनपुरे यांच्या भाजपा प्रवेशाबाबत गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होती. यापूर्वी राहुरी पोटनिवडणुकीदरम्यान त्यांनी माघार घेतली होती. त्यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर त्यांच्या प्रवेशाच्या चर्चांना वेग आला होता. तर आज तनपुरे यांनी खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेतली.

# कॉकरोच जनता पार्टीचे एक्स खाते तातडीने सुरू करण्यास कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**अभिजित** दीपके यांच्या नेतृत्वाखालील कॉकरोच जनता पार्टीला दिल्ली हायकोर्टात मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे एक्स खाते तातडीने पुन्हा सुरू करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. या खात्यावर टाकण्यात आलेल्या काही पोस्ट थोड्या आक्षेपार्ह असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांच्या खंडपीठाने या प्रकरणात केंद्र सरकार आणि एक्स प्लॅटफॉर्मची बाजू ऐकल्यानंतरच




अंतिम आदेश दिला जाईल, असे स्पष्ट केले. त्यामुळे सध्या तरी पक्षाला कोणताही अंतरिम दिलासा मिळालेला नाही.

अभिजित दीपके यांच्या वतीने वरिष्ठ वकील अखिल सिब्बल यांनी बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, आक्षेपार्ह मानल्या गेलेल्या काही पोस्ट ब्लॉक ठेवण्यात हरकत नाही. मात्र संपूर्ण खाते बंद करणे योग्य नाही. यावर न्यायालयाने, या प्रकरणात संपूर्ण कृतीच काही प्रमाणात आक्षेपार्ह वाटते, असे निरीक्षण नोंदवले. तथापि, न्यायालयाने दीपके यांना केंद्र सरकारच्या पुनरावलोकन समितीसमोर आपली बाजू मांडण्याची संधी दिली आहे. ही समिती सोशल मीडिया खाती ब्लॉक करण्याच्या आदेशांचा आढावा घेते. कॉकरोच जनता पार्टीची सुरुवात उपरोधिक स्वरूपातील संघटना म्हणून झाली होती. काही वादग्रस्त वक्तव्यांनंतर युवकांमध्ये आणि विरोधी पक्षांमध्ये या पक्षाची लोकप्रियता वाढली.



**सायन हॉस्पिटलजवळ सकाळी टॅक्सीला अचानक आग लागली. त्यात टॅक्सी जळून खाक झाली.** (छाया: दीपक साळवी)

# टीव्ही वाहिन्यांना दणका जाहिरातींवर लागली कात्री

**नवी दिल्ली-** दिल्ली उच्च न्यायालयाने आज दिलेल्या एका निकालामुळे खासगी टिव्ही वाहिन्यांना दणका बसणार आहे. न्यायालयाने दूरसंचार नियामक संस्था ट्रायच्या एका नियमाला आव्हान देणाऱ्या याचिका आज फेटाळल्या. या नियमानुसार वाहिन्यांना एका तासात फक्त बारा मिनिटे जाहिराती दाखवण्यास परवानगी आहे. ट्रायच्या या नियमाला अनेक वाहिन्यांनी व प्रसारकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आज न्यायालयाने याचिकांवर अंतिम निकाल देताना याचिका फेटाळून लावत ट्रायचा नियम योग्य असल्याचे स्पष्ट केले.

# शेअर बाजारात मोठी पडझड सेन्सेक्स १,०९२ अंकांनी कोसळला

■ मुंबई

**अमेरिका** - इराण दरम्यान युद्धबंदी कराराच्या अनिश्चिततेचे तीव्र पडसाद आज भारतीय शेअर बाजारात उमटले. विक्रीच्या दबावामुळे मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १०९२ अंकांनी कोसळून ७४,७७५.७४ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ३५९.४० अंकांच्या घसरणीसह २३,५४७.७५ अंकांवर स्थिरावला. निफ्टीने आज महत्त्वाचा २३,५५० अंकांचा स्तर तोडला.

सेन्सेक्समधील आजच्या पडझडीला रिलायन्स इंडस्ट्रीज, एचडीएफसी, आयसीआयसीआय बँक, बजाज फायनान्स आणि भारती एअरटेल यांसारख्या बड्या कंपन्यांमधील विक्री मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरली. ३० कंपन्यांवर आधारित सेन्सेक्समधील पॉवर ग्रीड या कंपनीच्या समभागांमध्ये सर्वाधिक ३.४६ टक्क्यांची घसरण झाली. हा समभाग आज २८९.७५ रुपयांवर आला. त्यापाठोपाठ इंटरग्लोब एव्हिएशन (इंडिगो) कंपनीच्या समभागात ३.२७ टक्के, एनटीपीसी, महिंद्रा अँड महिंद्रा, टाटा स्टील आणि बजाज फायनान्स या कंपन्यांच्या समभागांमध्ये अनुक्रमे २.८६ टक्के, २.७२ टक्के आणि २.६८ टक्क्यांची घसरण झाली.

नवा काळ विजय
उद्या वाचा



संघराज्य संतुलन आणि घटनात्मक विवेकाची गरज



भारत-ओमान वायूवाहिनी प्रकल्प का गरजेचा?



चीनचे स्टेशन, जगाला टेन्शन!

# प्रलंबित खटले वेगाने निकाली काढा सुप्रीम कोर्टाचे सर्व हायकोर्टांना निर्देश

■ नवी दिल्ली

**न्यायदानाच्या** प्रक्रियेत गती आणण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाने सर्व उच्च न्यायालयांसाठी दिशानिर्देश जारी केले आहे. एखाद्या खटल्याची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवल्यास तो तीन महिन्यांच्या आत देणे, जामीन मंजूर झालेल्या कच्च्या कैद्याची त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी कारागृहातून मुक्तता करणे आदि सूचनांचा त्यामध्ये समावेश आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत न्या. जॉयमल्या बागची आणि न्या. विपिन एम पांचोली यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने देशभरातील उच्च न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांची स्थिती पाहिल्यानंतर हे दिशानिर्देश दिले.

एखाद्या खटल्याचा निकाल दिल्यानंतर निकालाचा महत्त्वाचा भाग न्यायालयात वाचून दाखवावा आणि सविस्तर निकाल सात दिवसांच्या आत वेबसाईटवर अपलोड करावा. निकाल राखून ठेवलेल्या प्रकरणांमध्ये जर तीन महिन्यांच्या आत निकाल दिला गेला नाही तर नोंदणी महासंचालकांनी अशी बाब मुख्य न्यायाधीशांच्या निदर्शनास आणून द्यावी. मुख्य न्यायाधीशांनी जास्तीत जास्त दोन आठवड्यांची मुदत निकाल देण्यासाठी द्यावी. तेवढ्या अवधीतही जर निकाल दिला गेला नाही तर प्रकरणे दुसऱ्या खंडपीठाकडे वळते करावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. झारखंड उच्च न्यायालयाच्या एका निकालाला झालेल्या विलंबावरून दाखल झालेल्या याचिकेवरील सुनावणीप्रसंगी न्यायालयाने हे दिशानिर्देश दिले. झारखंड उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये दिलेला एक निकाल अद्याप उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेला नाही, अशी तक्रार याचिकाकर्त्याने केली होती.



# कॅनडात अस्वलाच्या हल्ल्यात केरळच्या फायटरचा मृत्यू

■ नवी दिल्ली

**कॅनडामध्ये** केरळमधील २७ वर्षीय एमएमए फायटर हृषिकेश कोलोथ याचा अस्वलाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. हृषिकेश कॅनडाच्या सास्काचेवान भागातील एका युरेनियम प्रकल्पावर कंत्राटी तंत्रज्ञ म्हणून काम करत होता. ८ मे रोजी कामाच्या ठिकाणी असताना त्याच्यावर अचानक अस्वलाने हल्ला केला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका कामगाराने अस्वलाला गोळी घालून ठार केले. त्यानंतर हृषिकेशला वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तो गंभीर जखमी झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. तपासासाठी त्या अस्वलाचे शवविच्छेदन करण्यात आले. या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलीस आणि वन्यजीव अधिकारी करत आहेत.

हृषिकेश मूळ केरळचा होता आणि तीन वर्षांपूर्वी मोठी स्वप्ने घेऊन कॅनडात गेला होता. त्याला बॉक्सिंग आणि एमएमएची खूप आवड होती. भविष्यात युएफसीमध्ये खेळण्याचे त्याचे स्वप्न होते. तो पेंटिक्टन येथील मार्शल आर्ट्स अकादमीत नियमित प्रशिक्षण घेत होता. त्यांच्या भावाने सांगितले की, हृषिकेशकडून सर्वांना मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र या दुर्दैवी घटनेमुळे त्याचा क्रीडा प्रवास आणि स्वप्ने दोन्ही अपूर्ण राहिले. सास्काचेवानमध्ये अस्वलांचे प्राणघातक हल्ले अत्यंत दुर्मीळ मानले जातात. हृषिकेश यांचा मृत्यू हा त्या प्रांतातील अशा प्रकारातील चौथा मृत्यू आहे.